मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | मुंबई, शनिवार, २१ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ९१ | पाने- ८


आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



'सनातन धर्म रक्षण मंडळ' स्थापन करण्याची वेळ आलीय

पान ४

# ज्याचा राजा व्यापारी त्याची जनता भिकारी...



**प्रतिनिधी**
**पुणे**

ज्या कंपन्यांमध्ये सरकारने हात घातला त्यांचा सत्यानाश झाला, असे विधान केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यात केले. तसेच ज्याचा राजा व्यापारी असतो त्याची जनता भिकारी असते, असेही गडकरी पुढे म्हणाले. डॉ. नानासाहेब परुळेकर यांच्या 127 व्या जयंतीनिमित्त शुक्रवारी पुण्यातील बालगंधर्व मंदिरात कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी नितीन गडकरी यांच्या व्याख्यानाचं आयोजन करण्यात आलेलं होतं. पंतप्रधान मोदी महाराष्ट्रात असताना गडकरी यांनी केलेल्या आजच्या वक्तव्यामुळे राजकिय वर्तुळात चर्चेला नवा विषय मिळाला आहे. नितीन गडकरी यांनी पायाभूत सुविधा आणि ऊर्जा क्षेत्रातील भारताचे भवितव्यावर विषयावर भाष्य केलं.

स्वातंत्र्यानंतर सुरुवातीला मोठमोठ्या कंपन्या सरकारने काढल्या. प्रत्येक क्षेत्रात सरकारचा सहभाग होता. पण नंतर लक्षात

## गडकरींच्या वक्तव्याने चर्चेला उधाण

आले की ज्याचा राजा व्यापारी असतो त्याची जनता भिकारी असते. सरकारचा हात एवढा अशुभ आहे की जिथे हात लागला तिथे सत्यानाश झाला. त्यामुळे मुलभूत गरजा आणि शेतीच्या प्रश्नांना प्राथमिकता मिळाली नाही, असे वक्तव्य गडकरी यांनी केले. पुणे-मुंबई प्रवास 6 तासांवरून दोन तासांवर आला आहे. बीओटी तत्त्वावर रस्ता बांधायला दिला नसता तर त्याला 25 वर्षे लागली असती. सरकारचा हस्तक्षेप कमी केल्यामुळे विकासाच्या कामांना गती मिळाली, असे गडकरी यांनी पुढे नमूद केले.

आता दिल्ली-मुंबई महामार्ग बांधायला घेतला आहे. त्याच महामार्गाला सुरतवरून नाशिक, अहमदनगर, सोलापूर, हैदराबाद असता रस्ता बांधणार असून यामुळे पुण्यातील ट्रॅफिक कमी होईल. तसेच पुण्यात तीन लेअरचे पूर बांधण्याचा विचार असल्याचेही गडकरी म्हणाले.

# मविआच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला

## 100-100-84

**प्रतिनिधी**
**मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा फॉर्म्युला ठरला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीसाठी 'ठाकरे- पवार आणि कांग्रेसचं ठरलं', असल्याचे बोलले जात आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटप जवळपास 80 टक्के पुर्ण झाल्याची माहिती आहे.

288 पैकी 100 जागा काँग्रेस, 100 जागा उद्धव ठाकरेंची शिवसेना तर 84 जागा शरद पवारांची राष्ट्रवादी लढेल, असे बोलले जात आहे. तर उर्वरित 4 जागा मित्र पक्षांसाठी सोडल्या जाणार असल्याची माहिती आहे. 2019 साली जिंकलेल्या काही जागांवर महाविकास आघाडीचं ठरलंय. तीनही पक्षाच 60 टक्के जागांवर एकमत असल्याची माहिती आहे. काही जागांवर अजूनही तिढा कायम पण लवकरच सोडवला



जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

महाविकास आघाडीचे जवळपास 80 टक्के जागा वाटपावर चर्चा पूर्ण झाली आहे. विदर्भ सोडून महाराष्ट्रातील उर्वरित जागावाटपाची चर्चा करण्यात आली आहे. 120 ते 130 जागांवर महाविकास आघाडीतील पक्षांमध्ये सहमती झाल्याची सूत्रांची माहिती आहे. तिढा असलेल्या जागांवर दुसऱ्या टप्प्यात चर्चा केली जाणार असल्याची माहिती आहे. 2019 च्या विधानसभा निवडणुकीत जिंकलेल्या जवळपास जागा त्याच पक्षाला जागा वाटपात दिला गेला असल्याची माहिती समोर आली आहे. जिंकलेल्या जागांमध्ये दहा ते वीस टक्के बदल केला जाणार असल्याचे बोलले जात आहे.

पहिल्या बैठकीत मुंबई -कोकण आणि त्यानंतर मराठवाडा,पश्चिम महाराष्ट्र,उत्तर महाराष्ट्र या विभागातील विधानसभा मतदारसंघातील जागांवर सविस्तर चर्चा महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये पार पडली. तिढा असलेल्या जागांवर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांकडून एक एजन्सी नेमून कोणत्या पक्षाची जास्त ताकद आहे,हे जाणून घेतले जाणार आहे. त्यानंतर अंतिम निर्णय शेवटच्या टप्प्यात घेतला जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. विदर्भातील विधानसभा जागांवर पुढील बैठकीत चर्चा होऊन त्या संदर्भात सुद्धा लवकरच निर्णय घेतला जाईल, लवकरात लवकर जागा वाटपावर निर्णय घेण्यासाठी नेते प्रयत्न करत आहेत.

# काश्मिरमध्ये बीएसएफच्या जवानांची बस दरीत कोसळली, चारजणांचा मृत्यू

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

काश्मीरच्या बडगाममध्ये मोठा अपघात झाला आहे. निवडणुकीच्या कामात व्यस्त असलेली एक बस जिल्ह्यातील वाटरहॉल भागात दरीत कोसळली. या अपघातात बीएसएफचे अनेक जवान जखमी झाले आहेत. बीएसएफच्या 35 जवानांना घेऊन जात असताना बस एका कड्यावरून घसरल्याने हा अपघात झाला. या अपघातात बसचेही मोठे नुकसान झाले आहे. येथील ब्रेल गावातील नाल्यात ही बस कोसळली आहे.

बीएसएफच्या पीआरओने अपघातात बीएसएफच्या चार जवानांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली आहे. अपघातस्थळी बचावकार्य सुरू करण्यात आले असून जखमींना खानसाहीब आणि बडगाम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही बस दक्षिण काश्मीरमधील पुलवामा येथून दुसऱ्या टप्प्यातील



निवडणुकीसाठी बडगामकडे येत असताना हा अपघात झाला.

25 सप्टेंबर रोजी दुसऱ्या टप्प्यात जम्मू-काश्मीरमधील 26 विधानसभा जागांवर मतदान होत आहे. बसमधील 35 जवानांपैकी सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. ही बस खान साहिब वाटरहॉल पोलीस चौकीवर जात होती. मात्र साधारणपणे 5 वाजण्याच्या सुमारास पोलीस चौकीपासून केवळ 600 मीटर दूर असतानाच हा अपघात झाला.

### *जालना- बीड रोडवर अपघात, आठ ठार*



***जालना :*** *जालना जिल्ह्यातील जालना - वडीगोद्री रोडवरील शहागडजवळ बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये 8 जण जागीच ठार झालेत. मृतांमध्ये बसमधील 6 तर ट्रकमधील दोघांचा समावेश आहे. 16 जण जखमी झालेत. जखमींपैकी 4 जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. दुसऱ्या वाहनाला ओव्हरटेक करण्याचा नादात आयशर ट्रक समोरून येणाऱ्या बसवर आदळला. त्यामुळे हा अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. अपघात इतका भीषण होता की, त्यात दोन्ही वाहनांचा चेंदामेंदा झाला.*

## म ह त्त्वा चे

### नंदुरबारमध्ये 200 जणांवर गुन्हा, 55 जणांना अटक

**नंदुरबार :** नंदुरबारमध्ये मिरवणुकीत आक्षेपार्ह बँनर झळकाविल्याप्रकरणी गुरूवारी दोन गटात दंगल उसळली होती. पोलिसांकडून दंगलखोरांची धरपकड सुरू असून याप्रकरणी चार अल्पवयीन मुलांसह 55 जणांना अटक करण्यात असून 200 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.
ही घटना गुरूवारी दुपारी तीन ते पाचच्या दरम्यान घडली. पोलीस मुख्यालयाकडून देण्यात आलेल्या माहितीत म्हटले आहे की, एका मिरवणुकीत एक इसम वाहनावर लहान मुलांला खांद्यावर घेवून उभा राहिला आणि फुले पुतळ्याच्या जवळ उभे राहुन मिरवणुक पाहणाऱ्या माळीवाडयाच्या परिसरातील लोकांकडे पाहून मुला करवी पहेलवानी दंड व पट थोपटत चिथावणी दिली. शिवाय काहीजणांनी औरंगजेब व टिपू सुलतान यांचे छापील बॅनर्स मिरवणुकीत झळकावीले व हातात एका विशिष्ठ धर्माचे झंडे घेवुन फडकवले आणि त्यावरून दोन गटात दंगल उसळली. यावेळी दंगलखोरांनी तुफान दगडफेक करत जाळपोळ केली होती.

### जरांगेंच्या समर्थनार्थ आज बीड बंदची हाक

**जालना :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीतून सरसकट आरक्षण मिळावे, या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे सहाव्यांदा उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ शनिवारी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. यापूर्वीही मनोज जरांगे यांचे विविध आंदोलने, शांतता रॅली, अंतिम इशारा सभांना जिल्ह्यात प्रचंड प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे उद्याचा संप देखील यशस्वी होण्याचा दावा केला जातो आहे.मनोज जरांगे यांनी ही अंतिम लढाई असल्याचा इशारा देत सहाव्यांदा उपोषणाला सुरुवात केली.

# नक्षलवाद 2026 पर्यंत हद्दपार करणार !

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी नवी दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी छत्तीसगढ मधील नक्षलवादी हिंसाचारातील पीडितांशी संवाद साधला. यामध्ये बस्तर शांतता समितीच्या अंतर्गत छत्तीसगढ मधील नक्षलप्रभावित भागात नक्षली हिंसाचारामुळे बाधित ५५ जणांचा समावेश होता. यावेळी काही पीडितांनी आपली व्यथा गृहमंत्र्यांना सांगितली.

नक्षलवादी हिंसाचारातील पीडितांशी संवाद साधताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार मार्च २०२६ पर्यंत नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी वचनबद्ध आहे. मोदी सरकारच्या धोरणांमुळे



आता डाव्या विचारसरणीचा नक्षलवाद केवळ छत्तीसगढमधील काही जिल्ह्यांपुरताच मर्यादित राहिला आहे. नक्षलवाद हा मानवता आणि देशाची अंतर्गत सुरक्षा या दोन्हींसाठी मोठा धोका आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत सरकार आणि छत्तीसगढ सरकार येत्या तीन महिन्यांमध्ये नक्षल प्रभावित झालेल्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक सर्वसमावेशक योजना आणणार आहे, असे अमित शाह यांनी सांगितले.

# सेन्सेक्स 84 हजार पार! गाठला नवा विक्रम

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबई प्रमुख बँकांच्या शेअर्समध्ये तेजी आणि जागतिक बाजारपेठांमध्ये सकारात्मक बदल याचा एकत्रित परिणाम शुक्रवारीभारतीय शेअर बाजारावर दिसून आला.

बेंचमार्क इक्विटी इंडेक्स, मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी-50 आठवड्याच्या अखेरीस एका टक्क्यांच्या उसळीसह ऐतिहासिक पल्ला गाठण्यात यशस्वी ठरले. सेन्सेक्स पहिल्यांदाच 84 हजार अंकांचा पल्ला गाठला. निफ्टीही जवळपास 25 हजार 800 अंकांची उसळी घेत पूर्वीच्या विक्रमा जवळ पोहोचला. तर सेन्सेक्स 1.63 टक्क्यांनी उसळी घेत 1359.51 अंकांनी वधारला. या विक्रमी उसळीनंतर तो 84 हजार 544.31 इतक्या विक्रमी कामगीरीसह बंद झाला. तसेच निफ्टी 1.48 टक्क्यांनी वधारत 375.15 अंकांनी उसळी घेत 25 हजार 790.95 या नव्या विक्रमावर बंद झाला. निफ्टीत शुक्रवारी 25 हजार 426.60 आणि 25 हजार 849.25 या दरम्यान व्यवहार झाले.

**केंद्राला मोठा दणका**

# मुंबई हायकोर्टाने सुधारित आयटी नियम ठरवले घटनाबाह्य

**प्रतिनिधी**
**मुंबई**

ऑनलाईन आणि सोशल मीडियावर केंद्र सरकारच्या कामकाजाशी संबंधित मजकुरांवर देखरेख ठेवून कथितरित्या असत्य, चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या बातम्या व मजकूर हटवणे सक्तीचे करण्याचे अधिकार सरकारला देणारे सुधारीत आयटी नियम मुंबई हायकोर्टाने घटनाबाह्य ठरवले आहे. यापूर्वी याप्रश्नी सुनावणी घेणाऱ्या खंडपीठामधील न्यायमूर्ती गौतम पटेल व न्यायमूर्ती नीला गोखले यांच्यामध्ये निर्णय देताना मतभिन्नता झाल्याने तिसऱ्या न्यायमूर्तींच्या विचारार्थ हा विषय पाठवण्यात आला होता. त्यानुसार न्यायमूर्ती अतुल चांदुरकर यांनी आज आपला निर्णय जाहीर केला. सुधारित आयटी नियम घटनाबाह्य व बेकायदा असल्याचा निर्णय त्यांनी दिल्याने आता हा निर्णय बहुमताचा झाला आहे.

माहिती-तंत्रज्ञान कायद्यांतर्गतच्या (आयटी) नियमांमध्ये केंद्र सरकारने ६ एप्रिल २०२३ रोजी पान ४ वर

# काँग्रेसला गणपती पुजेची अडचण



**प्रतिनिधी**
**वर्धा**

"काँग्रेस पक्षाला गणपती पूजेची अडचण आहे. मी जेव्हा गणपतीची पूजा केली तेव्हा त्यांना अडचण झाली. आपल्या संस्कृती बद्दल ज्यांना आदर आहे ते गणपती पूजेचा अपमान करु शकत नाही. सध्या अर्बन नक्षल आणि टुकडे टुकडे गँग काँग्रेस पक्ष चालवत आहे ", अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेस वर केली. वर्धा जिल्ह्यात एका कार्यक्रमात ते बोलत होते.

पान ४ वर

### *पीएम विश्वकर्मा योजनेतून कौशल्याला नवीन ऊर्जा - पंतप्रधान*

*पीएम विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा प्रदान करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. ही योजना म्हणजे देशात हजारो वर्षापासून असलेल्या पारंपरिक कौशल्याचा वापर विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. या कौशल्यामध्ये सर्वाधिक भागिदारी अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजसमुहाची आहे. या समुहातील कारागिर उद्योजक व्हावेत असा आमचा प्रयत्न असून त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देण्यासोबतच 'सप्लाय चेन 'सारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली.*

### *मोदींच्या कार्यक्रमाला आलेल्या महिलांना बुरशीयुक्त जेवण?*



*पंतप्रधान नरेंद्र मोदी वर्ध्यात योजनांचे उद्घाटन करण्यासाठी आले होते. पण या कार्यक्रमासाठी आलेल्या महिलांना बुरशी असलेले जेवण वाढण्यात आले आहे. त्यामुळे महिलांनी संताप व्यक्त केला. विश्वकर्मा योजनेला वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्ताने पंतप्रधान मोदी यांनी आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजना आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्ट-अप योजनेचा शुभारंभ केला. या कार्यक्रमासाठी दूरदूरहून अनेक महिलांनी हजेरी लावली. कार्यक्रमाच्या ठिकाणी महिलांसाठी जेवणाचीही सोय करण्यात आली होती. पण जेवणात जी भाजी वाढण्यात आली त्याला बुरशी लागली होती. या घटनेचे अनेक फोटो आणि व्हिडीओही व्हायरल झाल्यानंतर अनेकांनी संताप व्यक्त केला आहे.*



## सोमवारी युसुफ मेहेरअली यांच्या जयंतीदिनी जनता केंद्रात व्याख्यान

**मुंबई :** युसुफ मेहेरअली यांचा जयंती दिवस हा सामाजिक सलोखा दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. त्या निमित्ताने सोमवार 23 सप्टेंबर 2024. सायं. 5 वाजता. डॉ जी जी परिख (स्वातंत्र्य सैनिक) यांच्या अध्यक्षतेखाली "आजचे सामाजिक वास्तव व जबाबदारी" या विषयावर व्याख्यान व संवाद जनता केंद्र, तुळसीवाडी, मुंबई सेंट्रल पश्चिम. येथे आयोजित करण्यात आले आहे. वक्ते म्हणून प्रा. शमा दलवाई (सामाजिक कार्यकर्त्या) ॲड. इरफान इंजिनिअर (संचालक CSSS) हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन आयोजक युसूफ मेहेरअली सेंटर यांनी केले आहे.



## थोडक्यात

### नायर लैंगीक छळ प्रकरणी राज्य महिला आयोगाची पालिकेला नोटीस

**मुंबई:** मुंबई महापालिकेच्या नायर रुग्णालयात प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरचा सहयोगी प्राध्यापकाने लैंगिक छळ केल्याप्रकरणी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. मुंबई महापालिचे अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांना नोटीस पाठवून तात्काळ स्थिती अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. यासंदर्भातील माहिती समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी दिली. नायर रुग्णालयात घडलेल्या लैंगिक छळाची दखल घेऊन समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी त्यासंदर्भात राज्य महिला आयोगाकडे तक्रार करून चौकशी आणि कारवाईची मागणी केली होती. त्यानंतरच आयोगाने प्राथमिक चौकशी करीत महापालिका प्रशासनाला नोटीस पाठवली आहे. कामाच्या ठिकाणी लैंगीक छळ प्रतिबंधक आणि निवारण कायद्याच्या (पॉश)अंमलबजावणीत नायर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर मेढेकर यांनी अडथळे आणले. चौकशीच्या कामकाजात सहकार्य केले नाही. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास विलंब केला, अशी टिपण्णी मुंबई महापालिकेच्या चौकशी समितीने (पॉश) केल्याची वस्तुस्थिती आमदार रईस शेख यांनी आयोगाच्या समोर आणली होती. नायरमधील लैंगीक छळ प्रकरणी आपल्या स्तरावर केलेल्या कारवाईचा सद्यस्थिती अहवाल "महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ च्या कलम १२ (२) आणि (३) मधील तरतुदींनुसार तात्काळ सादर करावा," असे आयोगाने पालिका प्रशासनाला बजावलेल्या नोटीसीत नमूद केले असल्याचे आमदार रईस शेख यांनी सांगितले.

### विश्व सहकारी सम्मेलनाचे यजमानपद भारत भूषवणार

**मुंबई:** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सहकार से समृद्धि' या स्वप्नाला भारताचे पहिले केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वात एक वैश्विक ओळख मिळाली असून 'सहकार से समृद्धि' मूलमंत्रावर आधारित असे अनेक निर्णय घेण्यात आले. टॅक्स सुधारणा असो किंवा पैक्स राष्ट्रीय डेटाबेस निर्मिती, किंवा पैक्सचे कॉम्प्यूटरीकरण, अमित शाह यांच्या नेतृत्वात अनेक मूलभूत बदल करण्यात आले, या पार्श्वभूमीवर भारत पहिल्यांदाच विश्व सहकारी संमेलनाचे यजमान पद भूषविणार असल्याची माहिती इफकोचे अध्यक्ष दिलीप संघानी यांनी आज पत्रकारांशी बोलताना दिली. दिलीप संघानी पुढे म्हणाले की, आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडी (आयसीए)ची सर्वसाधारण सभा आणि जागतिक सहकारी परिषद २५ ते ३० नोव्हेंबर २०२४ दरम्यान नवी दिल्ली, भारत येथे आयोजित केली जात आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# चिंचोटी पूल मोजतोय अखेरच्या घटका...



सुधीर भोईर
■ वसई

◆सातत्याने लक्ष वेधूनही पालिकेचे पूलाच्या नवीन उभारणीसाठी दुर्लक्षच
◆माजी नगरसेविका प्रिती म्हात्रे यांचा पालिकेकडे पुन्हा पत्रव्यवहार

वसईतील प्रसिद्ध चिंचोटी धबधब्याला जोडणारा, हजारो अवजड वाहनांचा भार वाहणारा तसेच विद्यार्थी, चाकरमानी यांच्या ये-जा साठी उपयुक्त ठरणारा वसई पूर्वेतील चिंचोटी येथील पूल सध्या अखेरच्या घटका मोजतो आहे. पूल जीर्ण झाला असल्याने धोकादायक बनला आहे. याबाबत वसई -विरार महापालिकेच्या प्रभाग क्र.89 च्या माजी नगरसेविका प्रिती म्हात्रे या वारंवार पालिका प्रशासनाकडे पत्रव्यवहार करूनही पालिका पूलाच्या नव्याने उभारणीसाठी काणाडोळा करत असल्याने पूल वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. येथे अपघाताची शक्यता वर्तवली जात आहे.

चिंचोटी परिसरात औद्योगिक वसाहत मोठी आहे. त्यामुळे या कारखान्यांत दररोज शेकडो अवजड वाहने धोकादायक चिंचोटी पुलावरून ये-जा करत आहेत. शिवाय विद्यार्थी, चाकरमान्यांना याच पुलाचा वापर करावा लागतो. पावसाळ्यात तुंगारेश्वर अभयारण्यातील प्रसिद्ध चिंचोटी धबधब्याकडे जाण्यासाठी याच धोकादायक पुलावरून जावे लागते. दरम्यान, याच पुलाला जोडणारा एक नवीन रस्ता आमदार फंडातून तयार करण्यात आला होता. मात्र आता या नव्या रस्त्याचे अस्तित्वच नष्ट झाल्याचे चित्र दिसून येते. पालिकेकडे सतत पत्रव्यवहार करूनही पालिका पूलाच्या नवीन बांधकामासाठी दुर्लक्ष करत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. माजी नगरसेविका प्रिती म्हात्रे यांनी पालिका आयुक्त तसेच कार्यकारी अभियंता यांना याबाबत तिसऱ्यांदा पत्रव्यवहार केला आहे. चिंचोटी परिसरात मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहत आहे. तसेच पर्यटनप्रसिद्ध चिंचोटी धबधबा आहे. त्यामुळे या पुलावरून नागरिक, कामगार, विद्यार्थी यांची ये-जा सुरूच असते. अवजड वाहनांची सतत ये-जा सुरू असते. पुलाची आता वाहतुकीचा भार पेलण्याइतपत क्षमता न राहिल्याने येथे केव्हाही अपघात होण्याचा धोका आहे. त्यामुळे पुलाची पालिकेने लवकरात लवकर चिंचोटी पूल नव्याने बांधावा अशी मागणी माजी नगरसेविका प्रिती म्हात्रे यांनी एका पत्राद्वारे पालिकेला केली आहे.

# गणेश विसर्जनानंतर ऑक्टोबर हिटची चाहूल...

प्रतिनिधी
■ वसई

◆वसईच्या शहरी भागात उकाडा तर ग्रामीण भागात थंडावा

नुकतेच गणरायांचे विसर्जन झाल्यानंतर वसईत पावसाने देखील दडी मारली आहे. गणेश विसर्जनानंतर लगोलग नवरात्रोत्सवाची धुम सुरू होत आहे. मात्र तत्पूर्वीच वसईत ऑक्टोबर हिटची चाहूल सुरू झाली आहे. शहरी भागात उकाडा वाढु लागल्याने नागरिक गुलाबी थंडीची आतुरतेने वाट पाहत आहेत. साधारण ऑक्टोबर महिन्यात पावसाळा संपून वातावरणात उष्मा जाणवतो. त्यानंतर नोव्हेंबर महिन्यात गुलाबी थंडी त्याची जागा घेते. मात्र यावर्षी गणेश विसर्जनानंतर वातावरणात कोरडेपणा जाणवायला लागला असून ऑक्टोबर हिटची चाहूल सुरू झाली आहे.

सध्या ग्रामीण भागात भातशेतीचा हंगाम सुरू आहे. जमीन ओली आहे. गणेशोत्सवात झालेल्या पावसामुळे नद्या, ओहोळ दुधडी भरून वाहत आहेत. डोंगरदऱ्यांत अजून धबधबे वाहत आहेत. तसेच जमीन ओली असल्याने वातावरणात थंडावा शिल्लक आहे. शुद्ध हवा व हिरवळ यामुळे ग्रामीण भागात थंडावा असल्याने नागरिकांना रात्री व पहाटे अंगाला झोंबणाऱ्या थंडाव्याची अनुभूती मिळत आहे.

ग्रामीण भागात थंडावा असला तरी वसईत मात्र लख्ख ऊन पडले असल्याने नागरिकांना उकाड्याला सामोरे जावे लागत आहे. दुपारी कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांना रसवंती गृहाचा आधार घ्यावा लागत आहे. ऑक्टोबर महिन्यात उष्म्याचा सामना नागरिकांना करावा लागतो. मात्र आता गणेश विसर्जनानंतर लगेचच ऑक्टोबर हिटची चाहूल लागल्याने शहरी भागातील नागरिकांना गुलाबी थंडीची आतुरता लागली आहे. येत्या काही दिवसात नवरात्रोत्सवाची धुम सुरू होत आहे.दरम्यान, नवरात्रोत्सवात हलकासा पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



**मुंबई ।** घाटकोपर पूर्वेकडील बाबली कोणेकर मार्ग येथील कर्म भूमी या वसाहतीत राहणारे किसन मराठे यांचा काही दिवसांपूर्वी अपघातात पाय फ्रॅक्चर झाला होता. त्यांना विविध रुग्णालयात लाखो रुपये खर्चापोटी सांगण्यात आले होते. पण शिव आरोग्य सेनेच्या प्रयत्नांने लाखो रुपयांची ही शस्त्रक्रिया मुंबई महानगरपालिकेच्या घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात महात्मा फुले आरोग्यदायी योजनेतून मोफत करण्यात आली. याबद्दल मराठे कुटुंबांनी शिव आरोग्य सेनेच्या कार्यकर्त्यांचे आभार मानले आहे.

# बोईसर विधानसभा मतदारसंघासाठी महायुतीचा सावध पवित्रा

## बंडखोरी टाळण्यासाठी यंदा वरीष्ठांची कसरत

प्रतिनिधी
■ वसई

बोईसर विधानसभा मतदारसंघात बहुजन विकास आघाडीने सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला असला, तरी या विधानसभा मतदारसंघात बविआला मिळालेला विजय हा राजकीय बंडखोरीमुळे मिळालेला आहे. त्यामुळे बंडखोरीचा इतिहास पाहता यावेळी येथे महायुती सावध पवित्रा घेत असल्याचे चित्र दिसते. गेल्यावेळेस अवघ्या अडीच हजार मतांनी बविआला निसटता विजय मिळाला व बविआचे राजेश पाटील हे आमदार झाले. यंदा अशा स्वरूपाची बंडखोरी टाळण्याचा महायुती जरी प्रयत्न करणार असली तरी महाविकास आघाडीच्या स्वतंत्र उमेदवाराच्या मत विभाजनामुळे पुन्हा बविआलाच फायदा होण्याची दाट शक्यता राजकीय जाणकार वर्तवतात.

बोईसर विधानसभा मतदारसंघात बविआसाठी मत विभाजन हा महत्वाचा फॅक्टर ठरणार असला तरी लोकसभेतील मतांचे गणित बविआच्या गोटातही अस्वस्थता निर्माण करणारे आहे. येथे भाजप-शिंदे गट व अजित पवार गटाच्या महायुतीने मोठी मते मिळवत बोईसरमधील आपल्या विजयाच्या आशा पल्लवित केल्या आहेत. दरम्यान, भाजपकडून बोईसरसाठी विलास तरे यांनाच मैदानात उतरवले जाऊ शकते असा अंदाज आहे. तर एखाद्यावेळी बंडखोरी झाल्यास महायुतीला त्याचा फटका बसू शकतो. मात्र अशा बंडखोरांना आवर घालणे ही महायुतीच्या वरीष्ठांसाठी मोठी कसरत ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपने मतांची निर्णायक आघाडी घेतली असली तरी विधानसभेला चित्र वेगळे असते याचा विसर भाजपला पडला आहे. त्यामुळे हा मतदारसंघ आपणच सहज जिंकू हा भाजपचा भ्रम ठरण्याची शक्यता आहे. केंद्रात नरेंद्र व राज्यात देवेंद्र असा विचार आता मागे पडला आहे. आधीच वाढवण बंदर, केंद्रिय प्रकल्पांत स्थानिकांची झालेली घुसमट यामुळे भाजपला विधानसभा निवडणूक सहज घेता येणार नाही.

दुसऱ्या बाजूने बंडखोरीमुळे यावेळेस बविआला फायदा होणार नाही याची काळजी महायुती घेण्याची शक्यता आहे. तर बविआ येथून कोणाला संधी देते हादेखील तितकाच महत्वाचा विषय आहे. बोईसरमध्ये महाविकास आघाडीकडून कुणाला तिकीट मिळते यावरही मतांचे गणित अवलंबून असणार आहे. भारती कामडी यांना येथून मिळालेले मताधिक्य लक्षात घेता. बोईसरसाठी महाविकास आघाडी जोमाने मैदानात उतरणार यात शंका नाही.

## विद्यार्थ्यांनी साजरा केला गुरुजींचा वाढदिवस..

प्रतिनिधी
■ मोखाडा

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोरखडक तालुका मोखाडा जिल्हा पालघर येथील,शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा वाढदिवस साजरा केला. मुल ही देवा घरची फुले असतात असे म्हणतात,ज्याप्रमाणे एखादा कुंभार मातीच्या गोळ्याला आकार देतो,त्याचप्रमाणे शिक्षकही आपल्या विद्यार्थ्यांना घडवीत असतो.असेच विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोरखडक येथील शिक्षक देसले सर यांचा ५८वा वाढदिवस मुलांनी अनोख्या पद्धतीने शाळेत साजरा केला.

आपल्याच विद्यार्थ्यांनी आपला वाढदिवस साजरा केल्यामुळे,सर पूर्ण भावनिक झाले होते. आपल्या वाढदिवसाच्या औचित्य साधून सर्व विद्यार्थ्यांना देसले सर यांनी शालेय पोषण आहार सोबत गोड धोड जेवण दिले.त्यानंतर त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# पालकमंत्री रवींद्र चव्हाणांच्या वाढदिवसानिमित्त भाजपकडून शाळांमध्ये खाऊवाटप





तसेच भाजपा चे नेते व सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघर जिल्हा पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसा निमित्त भाजपा मोखाडा तालुका अध्यक्ष संतोष चोथे यांच्या मार्फत शालेय विद्यार्थ्यांना व रुग्णांना फळे व खाऊ वाटप कार्यक्रम आयोजित केला होता या वेळी जि.प.शाळा मोरखडक, ग्रामीण रुग्णालय मोखाडा, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय साखरी व डोल्हारा हायस्कूल या ठिकाणी खाऊ व फळांचे वाटप केले व कोकण शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या आमदार निधी मधून डिजिटल शाळा संच चे अनावरण देखील करण्यात आले त्यावेळी प्रत्येक शाळेवर तेथील सर्व शिक्षक तसेच भारतीय जनता पार्टी चे पदाधिकारी जिल्हा सचिव विठ्ठल पाटील,ज्येष्ठ नेते जयराम निसाळ,नगरसेवक प्रतीक पाघारे,महिला मोर्चा अध्यक्षा अलका बुधर,युवा मोर्चा जिल्हा सचिव दिशांत पाटील,युवा मोर्चा अध्यक्ष नरेंद्र चौधरी,हरिश्चंद्र जाधव,नितेश गोंदके, भूषण फाळके,पत्रकार भाऊ वैजल,रवींद्र बात्रे,साखरी ग्रा.प.सदस्य हरीचंद्र पाटील व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोस्टल रोड आठवड्यातील सातही दिवस राहणार सुरू

## सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत खुला

प्रतिनिधी
■ मुंबई

धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पातील वाहतूक व्यवस्था आठवड्यातील सातही दिवस सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्प हा शामलदास गांधी मार्ग (प्रिन्सेस स्ट्रीट) उड्डाणपूल ते वांद्रे-वरळी सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंत बांधण्यात येत आहे. आजतागायत या प्रकल्पाचे ९२ टक्के काम पूर्ण झाले आहे.

गणेशोत्सवादरम्यान मुंबई किनारी रस्ता प्रकल्प हा ६ सप्टेंबर २०२४ ते १८ सप्टेंबर २०२४ या कालावधीत २४ तास वाहतुकीसाठी खुला होता. आता, शनिवार २१ सप्टेंबर २०२४ पासून मुंबई किनारी रस्ता प्रकल्प वाहतुकीसाठी आठवड्यातील सातही दिवस सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. तर, रात्री १२ ते सकाळी ७ या वेळेत वाहतुकीसाठी बंद राहणार आहे.

दक्षिणवाहिनी बिंदूमाधव ठाकरे चौक, रजनी पटेल चौक (लोटस जंक्शन) आणि अमरसन्स उद्यान ते मरीन ड्राईव्ह ही मार्गिका तसेच, उत्तरवाहिनी मरीन ड्राईव्ह, हाजी अली आणि रजनी पटेल चौक

# मुंबईपासून दुरावलेल्या लाखो लोकांना हक्काचे घर देऊन पुन्हा मुंबईत आणू!

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची ग्वाही

प्रतिनिधी
■ मुंबई

रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पातील अडचणी दूर झाल्याने घरांचा प्रश्न मार्गी लागेल आणि मुंबईपासून दुरावलेल्या लाखो लोकांना हक्काचे घर देऊन पुन्हा मुंबईत आणू , अशी ग्वाही शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली. जनसंवाद यात्रेच्या तिसऱ्या टप्प्यात खासदार डॉ. शिंदे यांनी काल उत्तर-पश्चिम आणि उत्तर मुंबईमधील विधानसभा मतदार संघांचा आढावा घेतला.

खासदार डॉ. शिंदे पुढे म्हणाले की, मागाठाणेमध्ये घरांचा प्रश्न मोठा असून येथे 'एमएमआरडीए' आणि 'एसआरए'ने एकत्रपणे योजना सुरु केली आहे. तसेच एमएमआरडीए आणि एसआरए यांच्या संयुक्त विद्यमाने माता रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर झोपडपट्टीचे पुनर्वसन केले जाणार आहे. मागील काही वर्षात एसआरएमध्ये भ्रष्टाचार झाला, काहीजण तुरुंगात आहेत तर अनेक बिल्डर फरार आहेत. यामुळे लोकांना त्यांची हक्काची घरे मिळाली नाहीत. या प्रकल्पांची जबाबदारी सरकारने घेतली असून लाखो मुंबईकरांना हक्काचे घर मिळवून देऊ. आतापर्यंत सरकारने २२७ एसआरए प्रकल्प मार्गी लावले आहेत. मराठी माणसाला मुंबईत परत आणण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. गेली अनेक वर्षे ज्यांनी मुंबईत सत्ता गाजवली त्यांनी मात्र मुंबईकरांसाठी काहीच केले नाही, अशी टीका खासदार डॉ. शिंदे यांनी उबाठावर केली.




मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने शिवसेनेची सध्या राज्यभर जनसंवाद यात्रा सुरु आहे. पक्ष संघटन वाढवण्याच्या दृष्टीने कार्यकर्ते, पदाधिकारी, शाखाप्रमुखांशी चर्चा करणे तसेच सरकारी योजना लोकांपर्यंत पोहोचल्या का,याचाही यात आढावा घेण्यात येत आहे. शिवसेना घोडदौड करत असून विधानसभेत जास्तीत जागा निवडून येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# शुद्धीपत्रक

दि. ७ सप्टेंबर रोजी दैनिक वृत्तमानसमध्ये जा.क्र. वविशम/बो-कर / २४८/२०२४-२५ वसई-विरार शहर महानगपालिकेची प्रभाग समिती 'अे' जाहीरात छापण्यात आली होती.

| अ. क्र | दिनांक | मालमत्ता क्र. | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे नावे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नाव किंवा अभिहस्तांन कत्याचे नाव | खदीदाराचे किवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| २ | २६-०८-२०२४ | VR१९/११/२ | चितरंजन एम शेट्टी | जुलेखा नझीर साटी |
| ४ | २६-०८-२०२४ | VR२८/७९/१५ | विनोद जोशी | सविता दत्तात्रेय मोरे व दत्तात्रेय नंदकुमार मोरे |
| ८ | २६-०८-२०२४ | VR१७ /६७५ / २०४० | राजश्री राजेंद्र धगे व रोहन राजेंद्र धगे | ऍलेक्स मार्टीन फर्नाडीस व इनासिन मार्टीन फर्नाडीस |
| ९ | २६-०८-२०२४ | VR१७ / ५१२ / २०३ | पुत्तीलाल सरजुप्रसाद गुप्ता | श्रीमती सुशीला देवी |

च्या ठिकाणी

| अ. क्र | दिनांक | मालमत्ता क्र. | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे नावे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नाव किंवा अभिहस्तांन कत्याचे नाव | खदीदाराचे किवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| २ | २६-०८-२०२४ | VR१९/११/२ | चितरंजन एम शेट्टी | जुलेखा नझीर साठी |
| ४ | २६-०८-२०२४ | VR२८/७१/१५ | विनोद जोशी | सविता दत्तात्रेय मोरे व दत्तात्रेय नंदकुमार मोरे |
| ८ | २६-०८-२०२४ | VR१७ /६७५ / १०४० | राजश्री राजेंद्र धगे व रोहन राजेंद्र धगे | ऍलेक्स मार्टीन फर्नाडीस व इनासिन मार्टीन फर्नाडीस |
| ९ | २६-०८-२०२४ | VR१७ / ५१२ / १०३ | पुत्तीलाल सरजुप्रसाद गुप्ता | श्रीमती सुशीला देवी |

असे वाचावे.


Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 91
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ९१
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## आज राज्यपाल, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत होणार जुहू समुद्र किनारा स्वच्छ

**मुंबई :** केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय समुद्रकिनारा स्वच्छता दिनानिमित्त तसेच केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'स्वच्छता ही सेवा' अभियान अंतर्गत शनिवारी सकाळी ७.०० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत जुहू समुद्र किनारा (जुहू बीच) येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्री भूपेंद्र यादव, मुंबई उपनगरे जिल्हा पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, माननीय मुंबई शहर जिल्हा पालकमंत्री दीपक केसरकर यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वच्छता मोहीम पार पडणार आहे.महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्यासह इतर अधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत.



# संजय राऊत रोजच बोलतात, त्यांचे फार ऐकू नका !

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा टोला

प्रतिनिधी
■ मुंबई

संजय राऊत यांच्या बद्दल आम्ही काहीही बोलणार नाही. त्यामुळे पत्रकारांनी देखील त्यांचे जास्त ऐकण्याची आवश्यकता नसल्याचे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. काँग्रेस लहान भाऊ - मोठा भाऊ करत असेल तर लोकसभा निवडणुकीत आमच्यामुळेच त्यांच्या जागा वाढल्या असल्याचा दावा राऊत यांनी केला होता. काँग्रेसमध्ये फार खुमखुमी असल्याचा उल्लेख करत त्यांनी काँग्रेसवर टीकास्त्र सोडले होते. यावर कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नाना पटोले यांनी नकार दिला आहे. ते सकाळी रोजच बोलतात, त्यांच्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता नसल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे.



लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीत देखील काँग्रेसचा स्ट्राईक रेट हा सर्वाधिक असेल, असा दावा देखील नाना पाटोले यांनी केला आहे. सध्या महाराष्ट्राचे चित्र पाहता काँग्रेस नक्कीच विधानसभा निवडणुकीत परिवर्तन घडवून आणेल, असा दावा देखील त्यांनी केला. सध्या महाविकास आघाडीत जागा वाटपाची चर्चा सुरु असून या पार्श्वभूमीवर या दोन्ही नेत्यांच्या वक्तव्याकडे गांभीर्याने पाहिले जात आहे.

महाराष्ट्रात आगामी काळात येणाऱ्या दोन राजकीय नाटकांची चर्चा सध्या रंगली आहे. या पार्श्वभूमीवर देखील नाना पटोले यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला. स्वत:च्या जीवाला धोका असल्याचे सांगत एकनाथ शिंदे यांनी राज्यपालांकडे संरक्षण मागितले होते. त्यावेळी तत्कालीन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी थेट मुख्यमंत्री पदाची शपथच एकनाथ शिंदे यांना दिली. हेच महाराष्ट्रासाठी सर्वात मोठे नाटक असल्याची टीका देखील पटोले यांनी केली आहे. खोके वाल्या लोकांनी महाराष्ट्राचेच नाटक केले आहे. त्यामुळे कोणाला कोणते नाटक करायचे, ते करु द्या. महायुतीचे लोक वारंवार महाराष्ट्राची अब्रू वेशीवर टाकण्याचे काम करत आहे. आमदारांना विकत घेण्याच्या माध्यमातून लोकशाही विकत घेण्याचे काम महायुतीचे सरकार करत आहे. त्यामुळे नाटकापेक्षा त्यांच्या कृतीतून महाराष्ट्राची अब्रू वेशीला टांगली जात आहे. ती वाचवण्याचा काम काँग्रेस करणार असल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे.

कोणाला जास्त तर कोणाला कमी जागा मिळतात हे आमच्यासाठी महत्त्वाचे नाही. विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपात विजयी होण्याचा निकष सर्वात माहत्त्वाचा असल्याचा दावा देखील पटोले यांनी केला. त्यामुळे लहान भाऊ मोठा भाऊ अशा भूमिकेचा प्रश्नच येत नसल्याचे पटोले यांनी म्हटले आहे. राज्यातील महागाई वाढवणारे, तरुणांच्या विरोधातील महाराष्ट्र द्रोही सकरकारला सत्तेतून बाहेर काढणे ही एकमेव काँग्रेसची भूमिका असल्याचेही नाना पटोले यांनी स्पष्ट केले.

# मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे - जिल्हा निवडणूक विभाग

### विधानसभा निवडणूक तयारी ; महापालिका मुख्यालयात राजकीय पक्षांसोबत बैठक संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

आगामी विधानसभा निवडणुकीनंतर तयारीसाठी निवडणूक यंत्रणा प्रयत्नशील आहे. मात्र मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी अश्विनी जोशी यांनी सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांना आणि प्रतिनिधी यांना केले आहे.

मुंबईतील विविध मतदारसंघांमधील मतदार केंद्रांमध्ये झालेल्या सुसूत्रीकरणाची माहिती देण्यासाठी अश्विनी जोशी यांनी, निवडणूक जिल्हा अधिकारी भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत मुंबई महापालिका मुख्यालयात गुरुवारी सायंकाळी बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी हे आवाहन केले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, भारत निवडणूक आयोग यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार, मतदारांना सुलभतेने मतदान करता यावे, या दृष्टीकोनातून मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हे येथे मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. यामध्ये प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी पूर्वी असणारी सरासरी १५०० मतदारांची संख्या ही आता सरासरी १२०० ते १३०० पर्यंत असणार आहे. परिणामी, मतदान केंद्रांची संख्या वाढली आहे. त्यामुळे, मतदानाचे प्रमाण आणि वेग वाढेल. सबब, मतदान केंद्रांच्या या सुसूत्रीकरणाची माहिती मतदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. त्यामध्ये राजकीय पक्षांचे देखील सहकार्य अपेक्षित आहे, असे अश्विनी जोशी यांनी म्हटले आहे.

मतदान केंद्रांच्या २०८ केंद्राची वाढ मुंबई क्षेत्रातील मतदान केंद्रांची संख्या आता १० हजार १११ इतकी झाली आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत विधानसभा निवडणुकीसाठी सुसूत्रीकरण केल्याने २०८ मतदान केंद्र वाढले आहेत. या सुसूत्रीकरणाची माहिती देण्यासाठी तसेच मतदारांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली आणि याबाबत सविस्तर माहिती दिली.

**'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' मोहीम**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मुंबई क्षेत्रातील मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करताना प्रामुख्याने एका मतदान केंद्रावर यापूर्वी जी सरासरी मतदारसंख्या १,५०० होती, ती आता सरासरी १२०० ते १३०० मतदारसंख्या राहील, हे सूत्र लक्षात ठेवून मतदान केंद्रांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे, काही भागांमध्ये मतदान केंद्रांची संख्या वाढली आहे. तर, काही ठिकाणी मतदान केंद्रांचे विक्रेंद्रीकरण करण्यात आले आहे. परिणामी, या नवीन बदलांसंदर्भात मतदारांना माहिती देण्यासाठी प्रशासनाच्या वतीने 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' म्हणजेच 'Know Your Polling Station' ही जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत मतदार नोंदणी अधिकारी मतदारांच्या घरी जाऊन मतदान केंद्रांच्या ठिकाणामध्ये झालेल्या बदलांची माहिती देतील. याशिवाय, नोंदणीकृत मतदारांना लेखी पत्राद्वारे तसेच प्रसारमाध्यमांच्या माध्यमातूनही कळविण्यात येईल. मुंबईतील (मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा) मतदान केंद्रांच्या सुसूत्रीकरणाविषयी निवडणुकीच्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांकडून तसेच विविध प्रसारमाध्यमांतून मतदारांपर्यंत माहिती पोहोचविण्याची कार्यवाही केली जाईल. राजकीय पक्ष हे या प्रक्रियेतील महत्वाचे घटक आहेत. त्यामुळे, प्रशासनाप्रमाणेच विविध राजकीय पक्षांनीही मतदान केंद्रांच्या सुसूत्रीकरणाबाबत मतदारांपर्यंत माहिती पोहोचवावी. जेणेकरुन व्यापक स्तरावर जनजागृती होईल, असे आवाहन श्रीमती जोशी यांनी केले.

# 1 मार्च 2024 पासून राज्यातील कर्मचारी-शिक्षकांना सुधारित पेन्शन योजना लागू

प्रतिनिधी
■ मुंबई

१ नोव्हेंबर २००५ पासून केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्रात "राष्ट्रीय पेन्शन योजना" (NPS) तेथील सरकारी कर्मचारी-शिक्षकांना लागू करण्यात आली होती. परंतु सदरची योजना कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे जीवन, भावी आर्थिक व सामाजिक सुरक्षा गमाविणारे होते. राज्य शासनाने या "पेन्शन त्रुटीचा" विचार करण्याचे सौजन्य दाखविले आहे. त्यामुळे राज्यातील १७ लाख कर्मचारी-शिक्षक यांना दिलासा मिळाला आहे. त्यांच्या श्रमांची नोंद घेऊन शासनाने "सुधारित पेन्शन योजनेचा" जो शासन आदेश पारित केला आहे, त्याचे युनियनने स्वागत केले आहे.

१० टक्के योगदान (अंशदान) वगळता जुन्या पेन्शन प्रमाणे सर्व लाभ राज्य शासनाने कायम ठेवले आहेत. जसे, शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के सेवानिवृत्तीवेतन व त्यावर मिळणारा तत्कालीन महागाई भत्ता, ६० टक्के कुटुंबनिवृत्तीवेतन, उपदान, (Gratuity) रजा रोखीकरण, गट विमा योजना, इत्यादी सर्व लाभ पूर्वीप्रमाणे मिळणार आहेत. गेली १९ वर्षे कर्मचारी १० टक्के योगदान भरीत आहे. ज्यात शासन कमाल १८.५% इतके योगदान/अंशदान देणार आहे, यातून संचित झालेली रक्कम ही सुधारित पेन्शन देण्याचे कामी उपयोगात येणार आहे. यासाठी जनतेच्या विकास निधीतून उचल घेण्याची गरज भासणार नाही, अशी संघटनेची धारणा आहे.

सुधारित पेन्शन योजनेनुसार जे १० टक्क्यांचे अंशदान कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून वसूल केले जाणार आहे. त्या संदर्भात व्यवहारी विचार करुन, शासनाने कर्मचाऱ्याच्या निवृत्तीसमयी NPS च्या पध्दतीनुसार इतर वेगळ्या रुपात, कर्मचाऱ्याला योग्य परतावा मिळणे न्यायाचे होईल, अशी संघटनेच्यावतीने मागणी केली आहेच, अशी माहिती समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी दिली.

# विक्रोळीतील बेस्ट बसच्या वाहकावर चोरट्याचा चाकू हल्ला

प्रतिनिधी
■ मुंबई

विक्रोळी आगाराच्या एका बसवाहकावर बसमध्येच एका चोराने त्यांचा मोबाईल चोरताना त्याला हटकले असताना त्या चोराने बसवाहकवर चाकूने हल्ला करून त्यांना जबर जखमी केले.धारावी पोलिसांनी आरोपी शाहबाज खान यास अटक करून त्याच्या जवळून मोबाईल व चाकू हस्तगत केला आहे.



विक्रोळी आगाराची बस क्रमांक 7 ही बुधवारी रात्री 9.15 वाजता धारावी पिवळा बंगला येथे आली असता या बसवर कार्यरत असणारे बसवाहक अशोक डगले वय ४४ (क्रमांक 112727 (विक्रोळी आगार) यांचा एका चोराने मोबाईल चोरताना बसवाहकाने चोराचा हात पकडला असता चोराने दुसऱ्या हाताने त्यांच्या छातीवर व पायावर चाकूने वार केले व पळून गेला. सदर बसवाहकाला बसचालक क्रमांक 013767 यांनी सायन हॉस्पिटल येथे उपचाराकरिता नेले असून बस निरीक्षक व अधिकारी हॉस्पिटलमध्ये उपस्थित आहेत व जखमी बसवाहक यांच्यावर उपचार सुरू आहेत.ते शुद्धीवर आहेत. असे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत,उपाध्यक्ष .मनोहर जुन्नरे ,तसेच बेस्ट कामगार सेनेचे अनेक पदाधिकारी यांनी काल जखमी बस वाहकाची सायन रुग्णालयात भेट घेतली व प्रकृतीची विचारपूस केली.व बेस्ट मध्ये गेल्या तीन वर्षापासून समिती नसल्याने बेस्ट वर प्रशासक आहे. त्यांना जाब विचारण्यासाठी कोणीही नसल्याने बेस्ट मध्ये अधिकारी वर्गाचा सावळा गोंधळ चालू आहे. .बेस्ट मध्ये असे प्रकार आता वारंवार घडत आहेत, याला सर्वस्वी जबाबदार बेस्ट प्रशासन असून,त्यात बेस्टचे खाजगीकरण, बेस्ट मध्ये निवृत कामगार अधिकारी यांना परत कामावर घेणे,यामुळे बेस्टची शिस्त बिघडली आहे. असे सुहास सामंत म्हणाले.

**पश्चिम रेल्वे**
**शुद्धिपत्रक**

निविदा सूचना क्र: ईएल-टीआरडी-डब्ल्यू-११८-२४-२५-८ दिनांकित २०.०९.२०२४ साठी. निविदा उघडण्याचा दिनांक २०.०९.२०२४ (१५.३० वा.) ऐवजी ११.१०.२०२४ (१५.३० वा.) असा करण्यात आला आहे. निविदेच्या उर्वरित अटी आणि शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील. ०५६६

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**पश्चिम रेल्वे**
**फेरफार काम**

वरी. डीईई/टीआरडी/बीएल ई-निविदा सूचना क्र.: ईएल-टीआरडी-डब्ल्यू-११८-२४-२५-१० दिनांकित १८.०९.२०२४ मागवित आहेत. कामाचे नाव: मुंबई विभागामधील विरार-सूरत अनुभागामधील नंदूरबार यार्ड येथे प्रस्तावित एआरएमई आणि एआरटी सायडिंग संदर्भात ओएचई फेरफार काम. जाहीरात मूल्य: रु. ७०,९१,४९८/- इसारा रक्कम: रु. १,४१,८००/- सादरीकरण दिनांक आणि वेळ : २५.१०.२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २५.१०.२०२४ रोजी १५.३० वा. अधिक तपशिलासाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. प्रत्यक्ष प्रस्तावांवर विचार केला जाणार नाही. ०५५४

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**पश्चिम रेल्वे**
**विद्युत काम**

वरी. डीईई/टीआरडी/बीएल ई-निविदा सूचना क्र.: ईएल-टीआरडी-डब्ल्यू-११८-२३-२४-१४-आर-३ दिनांकित १७.०९.२०२४ मागवित आहेत. कामाचे नाव: मुंबई विभागामधील विरार – सुरत अनुभागामध्ये पॉवर सप्लाय इनस्टोलेशन (पीएसआय) आणि नॉन-पॉवर ब्लॉक ओव्हरहेड इक्विपमेंट (ओएचई) देखभाल कामांचे आउटसोर्सिंग. जाहिरात मूल्य: रु. २,८१,९२,०३१/- इसारा रक्कम: रु. २,९१,०००/- सादरीकरण दिनांक आणि वेळ: १८.१०.२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ : १८.१०.२०२४ रोजी १५.३० वा. अधिक तपशिलासाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. प्रत्यक्ष प्रस्तावांवर विचार केला जाणार नाही. ०५५२

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**इंडियन बैंक Indian Bank**
इलाहाबाद ALLAHABAD

मनोर शाखा: जीवदानी अपार्टमेंट, आस्था हॉस्पिटलच्या पुढे मनोर पोस्ट आणि तालुका, पालघर जिल्हा ४०१४०३दूर क्र: ७९७४०७२२०३, ई-मेल: M267@INDIANBANK.CO.IN

**ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी) [सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम – ८ (१) अंतर्गत]**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (दुसरा) ॲक्ट, २००२ अंतर्गत इंडियन बँक, मरोळ शखेचे प्रधीकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारंचा वापर करून कर्जदार/ गहाणदार/ हमीदार श्री. जीवन सिंग हरिसिंग भंडारी आणि श्रीमती सीमा जीवन सिंग भंडारी कर्जदार ह्यांच्याकडे रु. १४,२४,९६७/- (रुपये चौदा लक्ष चोवीस हजार नऊशे सदुसष्ट मात्र) चा भरणा करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित ११.०६.२०२४ रोजी जारी करण्यात आली होती.

कर्जदार/ गहाणदार/ हमीदार हे रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सूचना ह्याद्वारे कर्जदार आणि सर्व जनतेला ह्याद्वारे देण्यात येत आहे की निम्नस्वाक्षरीकारांनी नमूद नियमांच्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत त्याना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा १७ सप्टेंबर २०२४ रोजी घेतला आहे.

उपरोक्त नमूद केल्यानुसार विशेषत: कर्जदार/ गहाणदार/ हमीदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यावःर करू नये आणि मालमत्तेशी असा व्यवहार रु. १९,७८.०३८/- आणि त्यावरील व्याजाचा भरणा इंडियन बँककडे करण्याच्या अधीन असतील.

सुरक्षित मालामत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या पोटकलम (८) अंतर्गत असलेल्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**सुरक्षित मत्तेचे वर्णन**

सदनिका क्र. २०३, २ रा मजला, इमारत क्र. प्रकार ए, श्रद्धा रिद्धी सिद्धी पार्क, ऑफ वेलगाव रोड गाव मनोर पालघर पूर्व महाराष्ट्र मुंबई ४०१४०३. ६९६ चौ. फू. चटई क्षेत्रफळ. सीमा: उत्तर: साई कृपा, दक्षिण: खुली जमीन, पूर्व: रिद्धी आणि सिद्धी अपार्टमेंट पश्चिम: ऋषभ अपार्टमेंट .

**दिनांक: १७.०९.२०२४**
**ठिकाण: मुंबई**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी, इंडियन बँक**

**शहापूर नगरपंचायत, शहापूर. जि. ठाणे.**
कार्यालय दूरध्वनी क्र :- ०२५२७-२७२१८७
ई-मेल: shahapurnagarpanchayat@gmail.com/coud.shahapur@maharashtra.gov.in

जा/प.न.श.क्र. जाहिरात/१९११६/२०२४ दिनांक :- २०/०९/२०२४

**जाहीर सुचना**

शहापूर नगरपंचायत मार्फत विविध खालील कामांकरिता संबंधित नोंदणीकृत अधिकृत / ठेकेदारांकडूनद्वी लिफाफा पद्धतीने ई-निविदा दि. २१/०९/२०२४ रोजी पासून ते दि. ३०/०९/२०२४ पर्यंत मागविण्यात येत आहे.

या निविदा बाबत अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सदर निविदांबाबत कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगर पंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | फी | EMD |
|---|---|---|---|
| 1. | शहापूर नगरपंचायत मधील विविध विभागांकरिता कुशल/अर्धकुशल/ अकुशल कामगार पुरवठा करणे. | फि १९८०/- | २०,०००/- |

सही/-
( शिवराज वि. गायकवाड )
मुख्याधिकारी
शहापूर नगरपंचायत, शहापूर

**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**
नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट: http://kbmc.gov.in

संदर्भ -:कुबनप/उद्यान /८७/२०२४-२५ दिनांक २०/०९/२०२४

**कुळगाव बदलापूर नगरपरिषद.**
**ई-निविदा सूचना-२/२०२४-२५**

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कुळगांव बदलापूर नगरपरिषदेस चालक, इंधन व कामगारासह उद्याने व विविध ठिकाणी लागवड केलेल्या वृक्षांना पाणीपुरवठ्याकरिता पाणी टँकर भाड्याने पुरवणे. | ३०००=०० | ५००००=०० | ३ वर्षे |

निविदा फॉर्म दिनांक2-९-२०२४ ते दिनांक२०-९-२०२४ पर्यंत ई टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या शासन संकेतस्थळावर **http://mahatenders.gov.in** प्राप्त होतील. निविदा फॉर्म फी व निविदा इसारा रक्कम ऑनलाईन भरणेचे आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होईल. निविदेचे सादरीकरण२७९-२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करणेचे आहे.

वरील प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०-९-२०२४ रोजी दुपारी ४.०० वा. किंवा अन्य सोयीच्या दिवशी निश्चित होईल त्या दिवशी दालनात उपस्थित संस्थेचे प्रतिनिधी /कंत्राटदार अथवा अधिकृत प्रतिनिधी समोर उघडण्यात याच्यातील.

कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद यांनी राखून ठेवला आहे.

शिक्का

सही/-
(मारुती गायकवाड)
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

एचडब्ल्यू/एसआर/११३४ / जन एईएम / दि. २०/९/२४
सहाय्यक आयुक्त एच/ डब्ल्यू प्रभाग ह्यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (प), मुंबई ४०००५२.

**स्पॉट दरपत्रक सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिका बोलीदार जे काळया यादीमध्ये नाहीत/ ३ रा रोड (४ था रोड ते १ ला रोड), खार (पश्चिम) येथे महापालिका पे अँड पार्क योजना चालविण्यासाठी प्रतिबंधित करण्यात आलेले नाहीत अश्यांकडून मोहरबंद दरपत्रके मागवित आहेत. सदर कंत्राट हे सहा महिन्यांच्या तात्पुरत्या कालावधीसाठी असेल. नवीन दरपत्रके नवीन "पे अँड पार्क" च्या धोरणावर अंतिम निर्णय झाल्यानंतर जे लवकर असेल त्यानुसार बदललेल्या पार्किंग दरांच्या अनुसार मागविण्यात येईल.

कोरे दरपत्रक अर्ज मुख्य लिपिक (व्यय) विभाग, ३ रा मजला, एच / पश्चिम प्रभाग येथे २१.०९.२०२४ रोजी स. ११.०० वा. पासून २५.०९.२०२४ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत कामकाजाच्या दिवसांमध्ये रु. ३३०/- + १८% जीएसटीचा भरणा केल्यानंतर प्राप्त करता येतील.

दरपत्रकदाराला रु. ६०००/- इसारा रक्कम ठेव रोख स्वरूपात `एच/पश्चिम` प्रभाग ह्यांच्या कार्यालयामध्ये रविवार आणि सुट्टीचे दिवस वगळता सीएफसीमध्ये २५.०९.२०२४ पर्यंत स. ८.०० वा. ते सायं. ८.०० वा. दरम्यान करावा लागेल.

लाखेने पूर्ण मोहरबंद करण्यात आलेली दरपत्रके सहाय्यक आयुक्त एच/ पश्चिम प्रभाग ह्यांच्या उपरोक्त नमूद कार्यालयामध्ये व्यक्तिश: २६.०९.२०२४ रोजी दु. १.०० वा. पूर्वीपर्यंत जमा करावीत. टपालाद्वारे जमा करू नयेत. प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी त्यानंतर उपस्थित बोलीदारांच्या समोर जे त्यासाठी हजर राहू इच्छितात त्यांच्या समोर उघडण्यात येतील.

सहाय्यक आयुक्त, एच/ पश्चिम, कोणतेही कारण न देता कोणतेही किंवा सर्व दरपत्रके स्वीकारण्याचे आणि/ किंवा नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

पीआरओ/१३३७/जाही/२०२४-२५

सही/-
कार्यकारी अभियंता,
एच/ पश्चिम

गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.

स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ**

जा.क्र. अंनप/पापुवजनि/ २०२३-२४/५४१ दि. १६/९/२०१४

**कोटेशन नोटीस**

अंबरनाथ नगरपरिषदेस खालील काम करावयाचे असुन, नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडुन त्याबाबत सिलबंद कोटेशन्स मागविण्यात येत आहेत. ज्या कोणास सदर काम करावयाचे असेल त्यांनी सदर कामांचे दर सर्व करांसह बंद पाकीटात खाली सही करणार यांचेकडे दि.२७/०९/२०२४ रोजी सायं. ३.०० वाजे पर्यंत आणून द्यावेत. तसेच आलेली कोटेशन त्याच दिवशी किंवा प्रशासनाच्या सोयीनुसार हजर कोटेशन धारकांसमक्ष उघडण्यात येतील. कोणतेही एक कोटेशन स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे. तसेच खालील पैकी कोणतेही एक कागदपत्र सादर न केल्यास किंवा सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रात खरेपणा न आढळल्यास कोटेशन फेटाळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. (GST वगळून) | इसारा रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ पश्चिमेकडील वॉर्ड क्र. २७, मोरीवली गांव येथील भागवत यांचे घराजवळ व हनुमान मंदिर लोंगले यांच्या घराजवळील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे. | ४,९३,२६९/- | ४,९३३/- |

**१) तांत्रिक बोलीचा लिफाफाक्र. ०१**
अ) पॅनकार्ड ब) ईपीएफ प्रमाणपत्र. क) कॉन्ट्रॅक्टर परवाना. ड) जी. एस. टी. नोंदणी प्रमाणपत्र. इ) इसारा रक्कमेचा डी.डी
**२) वित्तीय बोलीचा लिफाफाक्र. ०२**
अ) मूळ प्रतितील दरपत्रक.
कोणतेही एक वा सर्व कोटेशन नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.
टिप :- सदर कोटेशन नगरपरिषदेच्या www.ambarnathcouncil.net या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत : १) प्रत :- सुरक्षा विभाग नगरपरिषद नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.

शिक्का

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ) प्रशासक,
अंबरनाथ नगरपरिषद

**केनरा बैंक Canara Bank**
भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking

**एआरएम-I शाखा, मुंबई :** ३७, क्षमालया, पाटकर हॉल समोर, न्यू मरीन लाईन्स, ठाकरसी मार्ग, मुंबई-४०० ०२० महाराष्ट्र.
**दू. क्र. :** ०२२-२२०६ ५४२५ / ३० ■ **ई-मेल :** cb2360@canarabank.com ■ **संकेतस्थळ :**.www.canarabank.com

**विक्री सूचना**

**प्रतिभूत हित (अंमलबजावणी) अधिनियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींसह वाचित प्रतिभूती आणि वित्तीय मालमत्तांची पुनर्रचना आणि प्रतिभूत हित अंमलबजावणी कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना**

सर्व जनतेस आणि विशेषतः कर्जदार व हमीदारांना सूचना देण्यात येते की, धनकोंकडे तारण / प्रभारात असलेली खालील नमूद मालमत्ता, जिचा **कॅनरा बँके**च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **प्रतिकात्मक कब्जा** घेतला आहे, ती **मेसर्स एबीएस इलेक्ट्रोप्लेटर्स (इं.) प्रा. लि. आणि जामिनदार (१) श्री. प्रकाश भट (२) श्रीमती ईश्वरी भट आणि (३) श्री. उत्तम प्रकाश भट आणि (४) मेसर्स एक्सेल मेटल फिनिशर्स** यांच्याकडून **कॅनरा बँके**च्या **एमआरएम-I** शाखेला देय रु. **१६४,२४,७९,३१४/-** (**३०.०७.२०२४** रोजी पासून **२९.०७.२०२४** रोजी पर्यंत अधिक पुढील व्याज आणि प्रभारासह) रकमेच्या वसुलीसाठी **"जसे आहे जेथे आहे"** **"जसे आहे जे आहे"** आणि **"तेथे जे काही आहे"** आधारावर **०५.१०.२०२४** रोजी विक्री करण्यात येईल.

राखीव किंमत आणि इसारा रक्कम ठेव खाली नमूद केल्यानुसार आहेत : **(रु. लाखांत)**

| लॉट क्र. | मालमत्तेचे वर्णन | राखीव मूल्य | इसारा रक्कम ठेव |
|---|---|---|---|
| १ | **श्री. प्रकाश भट आणि श्रीमती ईश्वरी भट** यांच्या नावावरील गट क्र. डी-२३ आणि डी-२४, एम. के. ब्रदर्स इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरी, एम. के. रोड, मुंबई-४०० ०७२ | **१९३.००** | **१९.३०** |
| २ | **मेसर्स एक्सेल मेटल फिनिशर्स** यांच्या नावावरील गट क्र. डी-२२, एम. के. ब्रदर्स इंडस्ट्रियल इस्टेट, मथुरादास वसानजी रोड, जरीमाय, कुर्ला-अंधेरी रोड, कुर्ला, मुंबई. | **६०.००** | **६.००** |
| ३ | कंपनीच्या नावावरील गाळा क्र. २०, डी-विंग, बिल्डिंग क्र. २, एम. के. ब्रदर्स इंडस्ट्रियल इस्टेट, जरीमरी, कुर्ला-अंधेरी रोड, कुर्ला, मुंबई | **९७.००** | **९.७०** |
| ४ | **श्री. प्रकाश भट आणि श्रीमती ईश्वरी पी. भट** यांच्या नावावरील फ्लॅट क्र. ४०१, एचजेके लोक दर्शन सीएचएस लि., ४था मजला, बिल्डिंग क्र. 'के', सीएसटी क्र. १३५, १३५/१, लोक दर्शन फेज-II, मिलिटरी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई | **१५४.००** | **१५.४०** |
| ५ | कंपनीच्या नावावरील फ्लॅट क्र. ६०१, ६०२, ६वा मजला, एचजेके लोक दर्शन को-ऑप. हौ. सोसायटी लि., मिलिटरी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई **(विलिन फ्लॅट)** | **३७१.००** | **३७.१०** |

इसारा रक्कम ठेव **०४.१०.२०२४** रोजी **सायं. ०५.०० वा.** पर्यंत किंवा तत्पूर्वी जमा करावी. कोणतेही भार बँकेला ज्ञात नाहीत.

राखीव किमतीच्या १०% इरठे रक्कम **प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक, एआरएम १ शाखा मुंबई** यांच्या नावे धनकार्षाने जमा करावी किंवा **कॅनरा बँक, एआरएम १ शाखा मुंबई** खाते क्र. २०९२७२४३४, आयएफसी कोड CNRB0002360 खात्याला **०४.१०.२०२४** रोजी **सायं. ०५.०० वा.** पर्यंत आरटीजीएस / एनईएफटी / फंड ट्रान्सफरद्वारा जमा करावी आणि अन्य दस्तावेज **०४.१०.२०२४** रोजी सायं. **०५.००** वाजता किंवा तत्पूर्वी सेवा प्रदात्यांकडे सादर करावेत. बँकेकडे दस्तावेज जमा करण्याची तारीख **०४.१०.२०२४ आहे.**


प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या पूर्व वेळ निश्चितीसह मालमत्तेच्या निरीक्षणाची तारीख पुढीलप्रमाणे आहे.

विक्रीच्या अटी व शर्तीसाठी कृपया **कॅनरा बँके**च्या संकेतस्थळ (www.canarabank.com) वर दिलेली लिंक **"ई-ऑक्शन"** लिंक पहा किंवा **डॉ. सीमा सोमकुवर, प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक, एमआरएम-I, मुंबई (दू. क्र. : ०२२-२२०६ ५४२५ / ३०, मो. क्र. ८६५५९६३४८९) किंवा श्री. दीपक कुमार, (मो. क्र. ९९६७२७८७२६) ई-मेल पत्ता :** cb2360@canarabank.com येथे कोणत्याही कामाजाच्या दिवशी कार्यालयीन कालावधी दरम्यान किंवा सेवा प्रदाते मे. **पीएसबी अलायन्स (ईबिक्रय), युनिट क्र. १, तिसरा मजला, व्हीआयओएस कमर्शियल टॉवर, वडाळा ट्रक टर्मिनल जवळ, वडाळा इस्टेट, मुंबई-४०० ०३७ संपर्क व्यक्ती श्री. धर्मेश आशर, मोबा. क्र. ९८९२२१९८४८** (avp.projectmanager2@psballiance.com), **हेल्प डेस्क क्र.** ८२९१२२०२२० (support.ebkray@psballiance.com) **संकेतस्थळ** : https://ebkray.in/ **यांना संपर्क करू शकता.**

**दिनांक :** १७.०९.२०२४
**स्थळ :** मुंबई

हस्ताक्षर/-
प्राधिकृत अधिकारी
**कॅनरा बँक, एआरएम-I शाखा**

नवीन विचार तर दररोज येत असतात पण त्यांना सत्यात उतरविणे हाच खरा संघर्ष आहे.



- महात्मा फुले

वृत्तमानस

मुंबई, शनिवार, २१ सप्टेंबर २०२४

# त्रासदायक गोष्टींचे करुया विसर्जन

यंदाचे वर्ष हे विधानसभा निवडणुकीचे असल्याने आपसूकच गणेश विसर्जन मिरवणुकीत अनेक ठिकाणी साउंड सिस्टीमचा आवाज जरा जास्तच वाढला असल्याचे चित्र सर्वत्र दिसत होते. आता गणेश उत्सव संपला असून काय दिवसांवर नवरात्र उत्सव येऊन ठेपला आहे. हा उत्सव सुद्धा विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीतच आल्याने अर्थात या उत्सवाचा आवाज देखील तेवढाच जोरात असणार आहे यात शंका नाही. नवरात्रीचे नऊ दिवस खेळल्या जाणाऱ्या रास दांडिया मध्ये डीजे आणि इतर वाद्यांचा आवाज देखील वाढलेला असेल हे नक्की. कारण या नवरात्र उत्सवाला सुद्धा राजकीय उमेदवारांचा आर्थिक हातभार लागणार आहे. त्यामुळे तो चढ्या आवाजात साजरा होणार आहे. मुळातच या साउंड सिस्टीम अर्थात डीजे अथवा डॉल्बीचा आवाज किती असावा अथवा डीजेला मान्यता देऊच नये, यावरून न्यायालयात अजूनही खल सुरूच असताना यंदा या आवाजाने बऱ्याच ठिकाणी कमाल पातळी गाठण्याचा विक्रम केला. याच आवाजाच्या अतिरेकाने विसर्जन मिरवणुकीत जितुर येथे एकाचा मृत्यू झाला तर राज्यात अनेक ठिकाणी या आवाजी दणदणाटात बहिरेपणाची समस्या निर्माण झाली आहे. यातच काही ठिकाणी लेसरचा वापर झाल्याने डोळ्यांना इजा होण्याचे प्रकारसुद्धा वाढीस लागले आहेत. गेल्या अनेक वर्षांमध्ये सणासुदीच्या काळात किंवा एखाद्या विशेष प्रसंगी मोठ्या आवाजामुळे होणाऱ्या त्रासांनी डोकं वर काढलं आहे. वास्तविक ध्वनिप्रदूषण हा प्रदूषणाच्या बाबतीत सर्वात शेवटी विचार केला जाणारा प्रकार होता, परंतु आता ध्वनिप्रदूषण ध्वनिप्रदूषण हे सर्वात पुढे आलेले, अग्रक्रमाने विचार करायला लावणारे आणि सोबत काळजी करायला लावणारे प्रदूषण झाले आहे. पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार आणि न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ध्वनीची मर्यादा दिवसा ५० ते ६५ आणि रात्री ४० ते ५५ डेसिबलपर्यंतच असणे गरजेचे आहे. त्याच्या वर गेल्यास ते ध्वनिप्रदूषण ठरते. आज आपल्याला आवाजाचे वेड लागले आहे. मोठ्या आवाजात आनंदोत्सव साजरा करणे हा आपला छंद झाला आहे. ध्वनिप्रदूषणामुळे बहिरेपणा, डोकेदुखी, चिडचिड, निद्रानाश होतो, रक्तदाब वाढतो, हार्ट अटॅक येतो; पण काळजी कोण घेतो, हा मोठा प्रश्न आहे. ध्वनीचे हे इतके सुंदर वरदान निसर्गाने आपल्याला दिले आहे. विज्ञान, तंत्रज्ञानाने ध्वनी आपण हवा तसा कमी-जास्त करून ऐकू शकतो. आपण मोबाइलवर बोलतो तो आपला आवाज विद्युत ऊर्जेत परावर्तित करून ऐकत असतो. आज मात्र ध्वनीचा वापर आपण लोकांना त्रास देण्याकरिता करीत आहोत असेच म्हणावे लागेल. ध्वनीची तीव्रता मोजण्यासाठी डेसिबल हे मापण आहे. ४० डेसिबलपर्यंतचा आवाज सुगम, मधुर असतो. आवाज ८० डेसिबलच्या वर गेल्यास तो कर्कश आणि हानिकारक असतो. आज तरुण पिढीला मोठ्या आवाजाचे वेड लागलेले दिसते. सण, उत्सव, निवडणुकीतला विजय वा अन्य आनंद साजरा करण्यासाठी मोठ्या आवाजाचे फटाके फोडले जातात. लाऊडस्पीकर, डीजे बिनदिक्कत वाजविले जातात. बऱ्याच जणांना यामुळे त्रास होतो, याकडे लक्ष नसते. यंदासुद्धा ठाण्यामधील विसर्जन मिरवणुकीत डीजे आणि त्या बरोबरच ढोल वाद्याच्या आवाजाचा अतिरेक असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुळात ढोल वाजवणे ही आपली परंपरा असली तरी त्याला आवाजाचीसुद्धा मर्यादा असल्याचा विसर सर्वांना पडला आहे. मोठे ढोल पथक विसर्जन मिरवणुकीत समाविष्ट करून आवाजाचा अतिरेक करण्यात मिळणारा आनंद कसला असतो याचे उत्तर कोणाकडेच नाही. डीजेचा वापर तर अगदी गल्लीबोळातील मंडळेसुद्धा बिनदिक्कतपणे करीत असून, त्यावर कर्कश आवाजात असणाऱ्या गाण्यावर नृत्य करण्यात अनेक जण आघाडीवर असतात. या डीजेचा आवाज आपण किती ठेवायचा याचे सोयरसुतक कोणालाच नसते. पुण्यात यंदा या आवाजाचा प्रचंड अतिरेक झाल्याने अखेर पोलिसांनी मिरवणुकीत जाऊन एका मंडळाचा डीजे साहित्य जप्त करण्याची कारवाई केली. ही घटना समाधानकारक असली तरी अन्यत्र तोच प्रकार खुलेआम सुरू होता. कोल्हापुरात सार्वजनिक मंडळाच्या गणपती विसर्जन मिरवणुकीत डॉल्बीचा दणदणाट होता. अखेर न्यायालयाच्या निर्णयानुसार रात्री बारा वाजता सुरू असणारा डॉल्बीचा दणदणाट रोखला गेला. या विसर्जन मिरवणुकीत अनेक मंडळांनी आकर्षक विद्युत रोषणाई डॉल्बी लावली होती. काही ठिकाणी पोलिसांनी सौम्य लाठी चार्जदेखील केला, तर हुल्लडबाज तरुणांना खाकी दमदेखील दिला. या आवाजाने मिरवणूक पाहायला आलेले आणि त्या परिसरात असलेल्या नागरिकांना, रुग्णांना किती त्रास होतो याची पुसटशी कल्पनासुद्धा अनेक मंडळांना नसते. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार आपण दररोज ऐकण्याचा आणि बोलण्याचा तेव्हा आवाज हा ४० ते ५० डेसिबलपर्यंत असू शकतो. जास्तीत जास्त सर्व ७० डेसिबल या मर्यादेपर्यंत आवाज कान सहन करू शकतात. त्याचप्रमाणे या आवाजाची तीव्रता जर ८० ते १०० डेसिबलपर्यंत गेली आणि तो आवाज सतत कानावर पडत राहिला तर ऐकण्याची क्षमता कमी होते. याउलट डीजेचा आवाज ९० ते १०० डेसिबल असतो. १०० ते १२० डेसिबलदरम्यानच्या आवाजामुळे कानाचा पडदा फाटण्याची किंवा चक्कर येण्याची शक्यता असते. डॉल्बी साउंड किंवा कोणत्याही वाद्याच्या अतिरेकी सलग दणदणाटाचा आपल्या आणि इतर प्राण्यांच्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावर थेट परिणाम होतो. हे आवाज अचानक कानावर येणं किंवा सलग काही काळ कानावर आदळणं या दोन्हीचेही विपरित परिणाम होतात. सतत कानावर आदळणाऱ्या आवाजामुळे चिडचिड वाढणे, एकाग्रता कमी होणे आणि डोकेदुखीसारखे त्रास उद्भवतात. शारीरिक आणि मानसिक आरोग्य हातात हात घालून जात असल्यामुळे दोन्हीपैकी एकही विस्कळीत झाल्यास व्यक्तीला त्याचा दुहेरी त्रास होतो. अपुऱ्या झोपेमुळे, विश्रांती अपुरी झाल्यामुळे मोठा फटका बसतो. ध्वनिप्रदूषण किंवा सणासुदीच्या काळात होणाऱ्या दणदणाटाचा त्रास टाळण्यासाठी सर्वात महत्त्वाचा उपाय म्हणजे ते प्रदूषण टाळणे ही यातील पहिली उपायांची पायरी आहे. यासाठी सामाजिक संस्था तसेच राजकीय नेत्यांनी स्वतः पुढाकार घेऊन हे प्रकार रोखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आज सण, समारंभांच्या नावावर सुरू असलेली ही आवाजाची बेबंदशाही कशी आणि कोण थांबविणार? आवाज वाढव डीजे... या गाण्याला अनुसरून वागणार की समाजाचा विचार करणार, हा प्रश्न आता निर्माण झाला आहे. यासाठी प्रत्येकाने सुज्ञ व्हायला हवे. ज्याप्रमाणे पर्यावरणाचा प्रश्न आपल्यासमोर उभा राहिला आहे त्याचप्रमाणे ध्वनी प्रदूषणाची समस्या देखील आपणच उभी केली आहे. त्यामुळे आता पर्यावरणासोबत आपल्याला दोन्ही प्रदूषणाची देखील काळजी घ्यावी लागणार आहे. सण उत्सव आनंदात साजरे करणे म्हणजे वाद्यांचा दणदणाट करणे असा नव्हे, किंवा परंपराच्या नावावर शुद्ध पाणी प्रदूषित करणे हा देखील या उत्सवाचा खर आहे तो असू शकत नाही. आपणच निर्माण केलेल्या या उत्सवांमध्ये घुसलेला हिडीसपणा आपणालाच दूर करावा लागणार आहे. अन्यथा आनंदाच्या आणि परंपरेच्या नावाखाली आपण आपल्या उत्सवाचे पावित्र्य गमावून बसू. उत्सवांसोबतच आपल्याला पर्यावरण निसर्गाची काळजी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे चुकीच्या आणि त्रासदायक गोष्टींचेही आपल्याला विसर्जन करावे लागणार आहे.

# विहिरी, शेततळे, वीज जोडणीसाठी भरीव अनुदान : बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या निकषांमध्ये सुधारणा



बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचे निकष सुधारून विहिरी, शेततळे, वीज जोडणी आदींसाठी भरीव अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सुधारित निर्णयानुसार नवीन सिंचन विहिरीस 4 लाखांपर्यंत तर जुन्या विहिरींच्या दुरुस्तीस 1 लाखांपर्यंत अनुदान देण्यात येईल. पूर्वी हे अनुदान अनुक्रमे अडीच लाख आणि पन्नास हजार एवढे होते. इनवेल बोअरिंगसाठी आता 40 हजार तसेच यंत्रसामुग्रीसाठी 50 हजार रुपये आणि परसबागेकरिता 5 हजार देण्यात येईल. नवीन विहिरींबाबत 12 मीटर खोलींची अट रद्द करण्यात आली आहे. तसेच दोन सिंचन विहिरींमधील 500 फूट अंतराची अट सुद्धा रद्द करण्यात आली आहे. शेततळ्याच्या प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी सध्या 1 लाख रुपये अनुदान देण्यात येते आता ते प्रत्यक्ष खर्चाच्या 90 टक्के किंवा 2 लाख यापैकी जे कमी असेल ते देण्यात येईल. त्याच प्रमाणे तुषार सिंचनासाठी सध्या 25 हजार रुपये देण्यात येतात. आता तुषार सिंचन संच 47 हजार रुपये किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90 टक्के अनुदानापैकी जे कमी असे ते अनुदान देण्यात येईल. अशाच प्रमाणे ठिबक सिंचन संचासाठी 97 हजार किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90 टक्क्यांपैकी जे कमी असेल ते अनुदान देण्यात येईल.

याशिवाय इतरही अनेक निकषांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनेंतर्गत घटकांचे आर्थिक मापदंड वाढविणे, निकषांमध्ये सुधारणा व नवीन घटकांचा समावेश करण्यात आला आहे

या योजनेंतर्गत पुढीलप्रमाणे अनुदानात वाढ व निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

**शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण**

प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळयाचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रू.2 लाख यापैकी जे कमी असेल ते.इनवेल बोअरिंगसाठी 40 हजार रुपये,वीज जोडणी आकारासाठी 20,000 किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते .विद्युत पंपसंच/डिझेल इंजिनसाठी 10 अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 40,000 यापैकी जे कमी असेल ते. सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंपसंच ऐवजी) प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रू. 50,000 यापैकी जे कमी असेल ते. एचडीपीई/ पीव्हीसी पाईपसाठी प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 100% किंवा रू. 50,000 यापैकी जे कमी असेल ते .

**सूक्ष्म सिंचन संच मध्ये तुषार सिंचन संचासाठी**

प्रचलित आर्थिक मापदंडान्वये तुषार सिंचन संच-रू.47,000/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% अनुदान यापैकी जे कमी असेल ते.

ठिबक सिंचन संचासाठी प्रचलित आर्थिक मापदंडान्वये ठिबक सिंचन संच-रू.97,000/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% अनुदान यापैकी जे कमी असेल ते.तुषार सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (1) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी 55% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 25% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून 10% तसेच (2) बहू भूधारकांसाठी 45% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 30% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून 15% किंवा रू. 47,000/- यापैकी जे कमी असेल ते.

ठिबक सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (1) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी 55% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 25% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून 10% तसेच (2) बहू भूधारकांसाठी 45% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 30% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून 15% किंवा रू. 97,000/- यापैकी जे कमी असेल ते.यंत्रसामुग्री (बैलचलित/ ट्रॅक्टर चलित अवजारे) (नवीन बाब) साठी 50 हजार रुपये.परसबागेसाठी पाच हजार रुपये.

त्याचप्रमाणे या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांसाठी लागू असलेली रु.1,50,000 वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत यंत्रसामग्री (बैलचलित / ट्रॅक्टरचलित अवजारे) ही नवीन बाब समाविष्ट करण्यात आली आहे.नवीन विहीरीबाबत रू. 4 लाख अनुदान मर्यादेपर्यंत विहीरीची खोली असावी, 12 मीटर खोलीची अट रद्द करण्यात आली आहे.महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम 1993 च्या कलम 3 नुसार अस्तित्वातील पेयजल स्त्रोताच्या 500 मीटर परिसरात नवीन विहिर घेण्यास प्रतिबंध घालण्यात आलेले आहेत. त्यामुळे अस्तित्वातील पेयजल स्त्रोताच्या 500 मीटर परिसरात सिंचन विहिर अनुज्ञेय करु नये, यास मान्यता देण्यात आली आहे. ही योजना अनुसूचित जमातीच्या लाभ धारकांसाठीच राबविण्यात येत असल्याने, दोन सिंचन विहिरींमधील 500 फूट अंतराची अट रद्द करण्यात आली आहे.

नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थीस 20 वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ देण्यात यावा. शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकासाठी प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रू.2 लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्याची तरतूद करावी. शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ मागेल त्याला शेततळे या योजनेबरोबरच इतर योजनेंतर्गत शेततळ्याचा लाभ घेण्यात आलेल्या तसेच स्वखर्चाने शेततळे केलेल्या शेतकऱ्यांना देखील देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत लाभार्थ्यास नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती किंवा शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण यापैकी एकाच घटकाचा व त्यासोबतच्या पॅकेजचा लाभ देय राहील.

अ) नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास नवीन विहीर, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/ पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. 6,42,०००/ किंवा रु. 6,92,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (विहीर- रु.4,00,000+ इनवेल बोअरिंग-रु.40,000 + वीज जोडणी आकार-रु.20,000 + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. 40,000 किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.50,000 + एचडीपीई/पीव्हीसी पाईप- रु. 50,000 + तुषार सिंचन संच रु. 47,000/ठिबक सिंचन संच रु. 97,000 + यंत्रसामुग्री- रु.50,000+ परसबाग रु.5,000 = रु. 6,42,000/किंवा रु. 6,92,000)

आ)जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास जूनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु 3,42,०००/ किंवा रु 3,92,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (जूनी विहीर दुरुस्ती- रु.1,००,०००+ इनवेल बोअरिंग-रु.40,000 + वीज जोडणी आकार-रु.20,000 + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. 40,000 किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.50,000 + एचडीपीई/पीव्हीसी पाईप- रु. 50,000 + तुषार सिंचन संच रु. 47,000/ठिबक सिंचन संच रु. 97,000 + यंत्रसामुग्री- रु.50,000+ परसबाग रु.5,000 = रु. 3,42,000/किंवा रु. 3,92,000)

इ) शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. 4,०2,०००/किंवा रु. 4,52,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण – रु.2,००,००० + वीज जोडणी आकार-रु.20,000 + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. 40,000 किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.50,000 + एचडीपीई/ पीव्हीसी पाईप- रु. 50,000 + तुषार सिंचन संच रु. 47,000/ठिबक सिंचन संच रु. 97,000 + यंत्रसामुग्री- रु.50,000+ परसबाग रु.5,000 = रु. 4,02,000/किंवा रु. 4,52,000).

**- दत्तात्रय कोकरे/विसंअ**

## पत्र मानस

### राक्षसी प्रवृत्तींना ठेचावे !

लोकमान्य टिळकांनी एका चाळीतून सुरु केलेला गणेशोत्सव आज जगभरात ज्या ज्या ठिकाणी हिंदू बांधव आहेत त्या त्या ठिकाणापर्यंत पोहोचला आहे. महाराष्ट्र त्यातही कोकण भागात गणेशोत्सव हाच वर्षातील प्रमुख उत्सव असतो. या उत्सवात केवळ जल्लोष नसून त्यामागे लोकांच्या धार्मिक भावना, श्रद्धा, प्रथा परंपराही जोडल्या गेलेल्या आहेत. साक्षात गणराज आपल्या घरी किंवा मंडपात येणार या भावाने प्रत्येक गणेशभक्त सर्व सिद्धता करतात. जोपर्यंत बाप्पा आल्याकडे विराजमान आहेत तोपर्यंत सर्व प्रकारची शुचिर्भूतता आणि पावित्र्य राखण्याचा प्रत्येक जण आटोकाट प्रयत्न करत असतो. गणरायाच्या आगमनासोबतच विसर्जनाचीही जोरदार मिरवणूक काढली जाते. १३० वर्षांहून अधिक वर्षांची परंपरा लाभलेल्या या उत्सवाला दरवर्षी कुठेनाकुठे गालबोट लागल्याच्या बातम्या ऐकायला मिळतात. बहुसंख्य हिंदू असलेल्या या हिंदुस्थानात हिंदूंनी त्यांचे सण-उत्सवही साजरे करायचे नाहीत का ? यंदा गणरायाच्या मूर्तीला चक्क पोलिसांच्या गाडीत डांबल्याचे वृत्त वाचून मन विषिन्न झाले. ठाण्यातील भिवंडी, जळगावमधील अमळनेर, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश या ठिकाणी गणेश विसर्जन मिरवणुकीवर धर्मांधांनी दगडफेक केली, चपला फेकल्या. या बातम्या वाचल्यावर आपण हिंदुस्थानात राहतो कि पाकिस्तानात असा पहिला प्रश्न पडतो. या देशात संख्येने हिंदू अधिक असूनही कधी ईदच्या उरुसमध्ये दगडफेक झाल्याच्या बातम्या वाचनात आल्या नाहीत; मात्र गणेशोत्सवात आणि नवरात्री उत्सवात हे प्रकार दरवर्षी घडतात. हिंदू बहुसंख्य असले तरी सहिष्णुता त्यांच्या रक्तात आणि शिकवणुकीत असल्याने ते या देशात अन्य पंथीयांशी एकोप्याने राहतात. हिंदूंच्या सहिष्णुतेचा अशा प्रकारे कुणी गैरफायदा घेऊन हिंदूंच्या उत्सवांना गालबोट लावण्याचे आणि सामाजिक शांतता बिघडवण्याचे काम मुद्दामहून करत असेल तर अशा राक्षसी प्रवृत्तींना ठेवण्याचे काम अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेने प्राधान्याने करायला हवे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

### डीजेचा जीवघेणा दणदणाट!

ध्वनी प्रदूषणामुळे दुर्लक्ष मंगळवारी गणरायाला वाजत गाजत निरोप देण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गणेशोत्सवात ध्वनी प्रदुषण होऊ नये यासाठी प्रशासनाकडून गणेशोत्सव मंडळांवर काही निर्बंध घातले होते. तसेच लेझर बिम लाईटवर देखील प्रशासनाकडून बंदी घालण्यात आली होती मात्र दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गणेश मंडळांनी प्रशासनाचे सर्व निर्बंध धाब्यावर बसवून गणेशोत्सवात तसेच विसर्जन मिरवणुकीत डी जे चा दणदणाट केला. डी जे चा दणदणाट वाढल्याने भाविकांच्या श्रवण क्षमतेच्या समस्येत ४० टक्के वाढ झाली. विसर्जन मिरवणुकीत तर डी जे चा दणदणाट सहन न झाल्याने मृत्यू झाल्याच्या बातम्या देखील वाचण्यात आल्या. लेझर बिम लाईटवर बंदी असताना विसर्जन मिरवणुकीत त्याचा सर्रास वापर करण्यात आल्याने अनेकांच्या डोळ्यांना इजा झाल्या. ध्वनी प्रदुषनाचे दुष्परिणाम माहीत असूनही गणपती मंडळांनी प्रशासनाचे निर्बंध धाब्यावर बसवून डी जे चा दणदणाट आणि लेझर बिम लाईटचा बेसुमार वापर केला. गणेश मंडळांकडून हे अपेक्षित नाही. गणेश मंडळांचीही कृती श्री गणेशाला देखील आवडली नसेल. आपल्या अशा वागण्याने आपण भाविकांचा जीव धोक्यात घालत आहोत याचे भान गणेश मंडळांनी ठेवायला हवे. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला त्या उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. गणेश मंडळांनी आपल्या या सवयी बदलल्या पाहिजेत. पुढील वर्षी तरी ध्वनी प्रदूषणाची मर्यादा पाळून गणेशोत्सव साजरा होईल ही अपेक्षा.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

### आरक्षण विरोधाचा विपर्यास वक्तव्य

विरोधी पक्षनेते राहुल गांधी अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना, जॉर्ज टाऊन युनिव्हर्सिटी विद्यार्थांपुढे आपले मत विचार मांडतांना, देशातील आरक्षण केव्हा संपणार? असा प्रश्न विचारण्यास आला असता, त्याने उत्तरा दाखल आरक्षण मध्ये निपक्षता येईल तेव्हाच ह्याचा विचार करता येईल. उत्तर अगदी सोप्पं होतं. आरक्षण संपवाव अशी भारताची आजची परिस्थिती नाही. ती जेव्हा येईल तेव्हा त्याचा विचार केला जाईल. असे त्यांनी स्पष्ट केले असताना, भाजपवाले राहुल गांधी आरक्षणाच्या विरोधात आहेत, त्यांचा विधानाचा विपर्यास करून, मोडतोड करुन, विरोध करत आंदोलन करत आहेत. नेते मंडळी प्रक्षोभक वक्तव्य करत आहेत. आणि त्याविरोधात गांधींच्या समर्थात काँग्रेस वाले पण आंदोलने करत आहेत. अशा परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले असताना, राहुल गांधी कुठे काही बोलले की सत्तारुढ भाजप समर्थक विरोध करत असतात. म्हणजेच इंडीया आघाडी, काँग्रेस चे नेते, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची सत्तारुढ भाजपला एवढी भीती वाटत आहे तर.

**- विजय कदम, लोअर परळ.**

### प्रतिज्ञापत्रात आईचे नाव हवेच

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे मुंबई लोकसभा मतदारसंघाचे विजयी उमेदवार खा.संजय दिना पाटील यांच्या खासदारकीची तक्रार याआधीच आलेली आहे. खा.संजय दिना पाटील यानी आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांच्या आईचे नाव दिले नसल्याने त्यांना कदाचित नियमानुसार अपात्र ठरवले जाऊ शकते आणि तसे झाले तर मात्र आयोगाला दुसऱ्या क्रमांकाच्या उमेदवाराला म्हणजेच भाजपाच्या मिहीर कोटेला विजयी घोषित करावे लागणार आहे. भाजपा नेते कोटे अवघ्या तीस हजार मतानी पराभूत झाले होते. उमेदवार आपल्या आईचे नाव अर्जात देत नाही ही बाब संताप आणणारी आणि गंभीर असल्याने निवडणूक आयोगाने खा.संजय दिना पाटील यांच्या उमेदवारीला आव्हान देणाऱ्या याचिकेवर लवकरात लवकर पण नियमानुसार निकाल द्यायला हवा असे वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### तिरुपती लाडू भेसळची चौकशी हवी

आंध्रप्रदेश येथील तिरुमल तिरुपती बालाजी देवस्थानात अनेक भाविक दर्शनासाठी येत असतात आणि या सर्व भाविकाना प्रसाद म्हणून लाडूचे वाटप केले जात असते. पण आता या लाडू प्रसादाबाबतच धक्कादायक माहिती आंध्रपदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडूनी दिलेली आहे. मागील सरकारच्या काळात म्हणजेच इंडिया आघाडीचे घटक असलेले वायएसआरसीपीचे अध्यक्ष व माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या काळात याच मंदिराच्या लाडू प्रसादात प्राण्यांच्या चरबीचे अंश आढळून आले होते. भाविकाना देण्यात येणारा लाडू हा निकृष्ट दर्जाचा,गुणवत्ते मध्ये तडजोड करणारा,भेसळयुक्त आणि मुख्यत्वेकरून भाविकांचा विश्वासघात करणारा तसेच त्यांच्या धार्मिक भावना दुःखवणारा असल्यामुळे हा एक प्रकारचा गंभीर गुन्हा ठरला आहे तेव्हा या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी ही झालीच पाहिजे असे वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला,**

५ वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, शनिवार, २१ सप्टेंबर २०२४

## आदिवासी बांधवांचे पनवेल पंचायत समितीसमोर बेमुदत आंदोलन

**पनवेल :** स्वातंत्र्याच्या 77 वर्षानंतरही आदिवासी बांधवांच्या मूलभूत हक्काचे प्रश्न प्रलंबित आहेत त्यामुळे आदिवासी बांधवांनी पनवेल पंचायत समिती समोर बेमुदत निर्णायक आंदोलन केले. पालघर, ठाणे, नाशिक, रायगड हे जिल्हे शहरी व ग्रामीण भागांमध्ये विभागलेले आहेत. मोठ्या प्रमाणात या जिल्ह्यात आदिवासी व आदिम कातकरी जमातीचे पिढ्यानपिढ्याचे वास्तव्य आहे. त्यांचे अनेक मुलभूत हक्कांचे प्रश्न देशाच्या स्वातंत्र्याला ७७ वर्षानंतरही प्रलंबित आहेत. हे प्रश्न शासनाने लवकर सोडवण्यासाठी श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातून पनवेलसह विविध भागात आदिवासी समाजाने 20 सप्टेंबर रोजी आंदोलन पुकारले. पनवेल पंचायत समितीसमोर केलेल्या या आंदोलनात शेकडो आदिवासी बांधव सहभागी झाले. या मोर्चाचे नेतृत्व श्रमजीवी संघटनेचे महाराष्ट्र सरचिटणीस बाळाराम भोईर ,रायगड जिल्हा अध्यक्ष हिरामण नाईक, सत्यजित वाजपेयी यांनी केले



# पोलीस भरती गैरव्यवहारातील पाळेमुळे मराठवाड्यात, आणखी 10 आरोपींना अटक

प्रतिनिधी
■ अलिबाग

रायगड जिल्ह्यात यंदा पोलीस भरती प्रक्रिया सुरू असताना १० ऑगस्ट रोजी घेतलेल्या लेखी परीक्षेत 6 उमेदवारांनी गैरप्रकार केले होते. या उमेदवारांकडे चिप आढळून आल्या होत्या. पोलिसांनी लगेचच त्या 6 उमेदवारांना अटक केली होती. त्यानंतर त्यांना मदत करणारे कोण आहेत, त्याचा सखोल तपास करताना आणखी 10 जणांना पोलिसांनी अटक केली आहे. हे उमेदवार आणि त्यांना मदत करणारे सर्व मराठवाड्यातील आहेत.

रायगड जिल्ह्यातील 391 पोलीस पदासांठी ऑगस्टमध्ये भरती प्रक्रिया सुरू होती. त्यासाठी राज्यातून 4 हजार 747 उमेदवार परीक्षा देत होते. लेखी परीक्षेसाठी पेणमधील परीक्षा केंद्रावर एक आणि अलिबागमधील चार परीक्षा केंद्रावर ५ अशा सहा विद्यार्थ्यांच्या कानात डिव्हाईस आढळले होते. त्यानंतर



त्यांना अटक करून त्यांच्यावर विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते. यात रामदास जनार्दन ढवळे (23, बीड), दत्ता सुभाष ढेंबरे (22, बीड), ईश्वर रतन जारवाल (21, जालना), गोरख गंगाधर गडदे (24, बीड), सागर धरमसिंग जोनवाल (20, छत्रपती संभाजीनगर) आणि शेखर बाबासाहेब कोरडे (27, बीड) या उमेदवारांचा समावेश होता.

दरम्यान, गुन्ह्यांचे गांभीर्य पाहून कोकण परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याशी चर्चा करून तपास अधिकारी पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रायगड व इतर पोलीस अधिकाऱ्यांची तातडीने बैठक बोलावून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, तत्कालीन अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी तातडीने विशेष तपास पथक नेमून त्यांना महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये पाठवून आरोपींना मदत करणाऱ्यांचा कसोशीने शोध घेण्याच्या सूचना केल्या. त्याप्रमाणे मदतीसाठी सायबर विशेष पथकाची देखील नेमणूक करून त्यामध्ये सायबरचे उत्तम ज्ञान असणारे पोलीस अधिकारी व अंमलदारांची नियुक्ती करण्यात आली. या सर्वांनी अथक मेहनत घेऊन आरोपी उमेदवारांना मदत करणाऱ्या 10 आरोपींना अटक केली आहे.

या आरोपींमध्ये पवन त्रंबक बमनावत (25, नळणी, जालना), नारायण निवृत्ती राऊत (29, नाळवंडी, बीड), प्रताप ऊर्फ भावड्या शिवसिंग गोमलाडू (25, वैजापूर, छ.संभाजीनगर), नागम्मा हनुमंत इबीटदार (20, देगलूर, नांदेड), अर्जुन नारायण बेडवाल (24, परसोडा, छ. संभाजीनगर), मंगेश बालाजी चोले ऊर्फ चोरमले सर (34, जळकोट, लातूर), संतोष सांडू गुसिंगे (30, पैठण, छ. संभाजीनगर), पूनम राम वाणी (23, पडेगाव, छ. संभाजीनगर), जीवन मानसिंग नायमने ऊर्फ एस. राठोड ऊर्फ करण जाधव (जोडवाडी, छ. संभाजीनगर), जालींदर श्रीराम काळे (32, नाळवंडी, बीड) यांचा समावेश आहे. अजूनही इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

# डोंबिवलीसाठी स्वतंत्र 585 कोटींची पाणी योजना

प्रतिनिधी
■ डोंबिवली

शहाड पाणी पुरवठा योजना पुनर्जीवित करून डोंबिवलीच्या पाण्यासाठी स्वतंत्र ५८५ कोटींची पाणी योजना मंजूर करण्यात आली आहे. खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. बारवी पाणी पुरवठा योजनेवरील वाढती मागणीमुळे डोंबिवली औद्योगिक क्षेत्राकरीता कमी दाबाने अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील, परिसरातील ग्राहकाच्या अपुऱ्या पाणी पुरवठयाच्या तक्रारी वाढल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवली शहरातील काही भाग, डोंबिवली औद्योगिक क्षेत्र आणि आसपासच्या भागातील



नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा व्हावा यासाठी शहाड पाणी पुरवठा योजना पुनर्जीवित करण्यात येत असून यासाठी एमआयडीसीच्या माध्यमातून ५८५ कोटी रुपयांचा निधीला मंजुरी देण्यात आली आहे. याअंतर्गत जलवाहिनी टाकण्याबरोबरच विविध कामे केली जाणार आहेत. या योजनेच्या पुनर्जीवनासाठी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या पाठपुराव्याला यश मिळाले असून कल्याण, डोंबिवली आणि आसपासच्या विभागातील नागरिकांची पाण्याची समस्या मार्गी लागणार आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघातील शहरांना मुबलक पाणी पुरवठा करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहे. तसेच जल जीवन मिशन राबविण्यात येत आहे. याच पद्धतीने कल्याण, डोंबिवली, डोंबिवली औद्योगिक क्षेत्र आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा व्हावा यासाठी राज्याचा पाणी पुरवठा विभाग, एमआयडीसी यांच्या समवेत सातत्याने बैठकीत वाढीव पाणी पुरवठ्याची मागणी केली होती.

## पती-पत्नीची गळफास घेऊन आत्महत्या

■ शहापूर

येथील नडगाव भागात पती-पत्नीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणाची नोंद शहापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मुल होत नसल्याने त्यांनी नैराश्यातून आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. हरेश उघडे (२८) आणि निलम उघडे (२५) अशी आत्महत्या केलेल्या दोघांची नावे आहेत. नडगाव येथील बेलपाडा परिसरात ते वास्तव्यास होते. आठ वर्षांपूर्वी त्यांचा विवाह झाला होता. गुरुवारी त्यांचा मृतदेह घरामध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती शहापूर पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखळ झाले. मुल होत नसल्याने त्यांना नैराश्य आले होते. त्यामुळे त्यांनी आत्महत्या केली असावी असा अंदाज पोलीस व्यक्त करत आहेत.

## प्लास्टिकमुक्त सोसायटीच्या अंमलबजावणीस 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यात गती




प्रतिनिधी
■ नवी मुंबई

17 सप्टेंबरपासून संपूर्ण देशभरात 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा साजरा करण्यात येत असून त्या अंतर्गत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहेत. यामध्ये प्लास्टिकमुक्त मार्केट ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात येत असून आज आठही विभाग कार्यालय क्षेत्रात मार्केट्समध्ये प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिक न वापरण्याविषयी व्यापक जनजागृती करण्यात आली. तसेच मार्केट्समध्ये विक्रेत्यांना व उपस्थित ग्राहकांना कापडी व कागदी पिशव्यांचे वाटपही करण्यात आले.

प्लास्टिकमुळे पर्यावरणाची व मानवी जीवनाची होणारी हानी लक्षात घेउन एकल वापर प्लास्टिक पूर्णपणे हद्दपार करावे या बाबत नागरिकांमध्ये जाणीव जागृती करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे व डॉ. संतोष काठोळे यांच्या माध्यमातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.

## उल्हासनगर पालिकेतर्फे 'स्वच्छता ही सेवा'अंतर्गत 'स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता' जनजागृती

### नागरिकांना देण्यात आली स्वच्छता शपथ



प्रतिनिधी
■ उल्हासनगर

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार व मा. प्रशासक तथा आयुक्त विकास ढाकणे यांच्या आदेशानुसार, व मा. अतिरीक्त आयुक्त डॉ. किशोर गवस मा. अतिरीक्त आयुक्त श्री. लेंगरेकर मा. उप - आयुक्त डॉ. सुभाष जाधव यांच्या सूचनेनुसार तसेच सहा. सा.आरोग्य अधिकारी श्री. मनिष हिवरे , मुख्य बाजार निरीक्षक श्री. विनोद केणे व मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री. एकनाथ पवार यांच्या मार्गदर्शनानुसार आज दिनांक 20/09/2024 रोजी प्रभाग समिती क्र 03, अंतर्गत पॅनल क्र 11 मध्ये साई पार्क अपार्टमेंट मागे, इंदिरा गांधी उद्यान जवळ, वाघरीपाडा, उल्हासनगर - 3 येथे CTU (cleaning target unit / black spot) ठिकाणी स्वच्छता ही सेवा अंतर्गत "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" मोहीम नुसार विशेष सफाई अभियान राबवून नागरीकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली.

सदर अभियानात स्वच्छता निरीक्षक , मुकादम व सफाई कर्मचारी उपस्थित होते. सदर अभियानात सफाई स्वच्छता करून स्वच्छता शपथ घेण्यात आली. नागरिकात जनजागृती करून आपल्या घरातील देनंदिन निघणारा कचरा वर्गीकृत करून महापालिकेच्या कचरा संकलक किवा दारासमोर येणाऱ्या घंटागाडीत द्यावा . आपले शहर स्वच्छ व सुंदर राखण्यासाठी महापालिकेस सहकार्य करावे असे जाहीर अहवान करण्यात आले

## शिळ सर्कल ते दिवा स्टेशन पर्यंतचे रस्ते खड्डेमुक्त करा!

### प्रहार जनशक्ती पक्षाचे सहायक आयुक्तांना पत्राद्वारे साकडे



प्रतिनिधी
■ दिवा

शिळ सर्कल ते दिवा स्टेशन पर्यंत रोडवरील खड्यामुळे अनेक लोकांचे जीव धोक्यांत आले आहेत. लहान लहान मुलांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे शाळा - कॉलेज मध्ये येणाऱ्या - जाणाऱ्या विद्यार्थीचे दैनंदिन जीवन अडचणीत आले आहे.खड्यामुळे फार मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्यामुळे कामावर येणाऱ्या - जाणाऱ्या माणसांच्या अनेक अडचणीत वाढ झाली आहे.

यापूर्वी जे रस्ते बनवले होते त्या अनेक खड्डे निर्माण होऊन अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.त्यामुळे या रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करून दिवावासीयांना दिलासा द्यावा असे साकडे प्रहार जनशक्ती पार्टीचे ठाणे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत गायकवाड यांनी पत्राद्वारे सहायक पालिका आयुक्त दिवा प्रभाग यांना घातले आहे. ठाणे जिल्हा प्रहार जनशक्ती पार्टीने पक्षाचे अध्यक्ष व माजी मंत्री बच्चू कडू यांच्या आदेशानुसार दिवा आणि ठाणे परिसरातील रस्त्यांच्या दुर्दशेबाबत सतत आवाज उठवण्याचे ठरवले आहे. खड्डेमुक्त रस्ते दिवा आणि परिसराला मिळत नाहीत तोपर्यंत 'प्रहार'चे आंदोलन सुरूच राहील असे ठाणे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे. 'प्रहार'चे कळवा मुंब्रा विधानसभा अध्यक्ष आदित्य गौतम चिकटे यांनीही खड्डेयुक्त रस्त्यांच्या समस्यांवर पत्रे लिहून पालिका प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

## ‘माझी मिळकत माझी आकारणी‘ सेवेमुळे कर आकारणी होणार सुलभ !

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना स्वत:च्या मिळकतीच्या बदलाची किंवा वापरातील बदलाची नोंद तसेच कर आकारणी न झालेल्या मिळकतीची कर आकारणी घरबसल्या जलद व सहजपणे करण्याची सुविधा "माझी मिळकत माझी आकारणी" या योजनेतून उपलब्ध केली आहे. यामुळे, नागरीकांच्या वेळेची बचत होणार आहे. चला तर मग जाणुन घेऊया कशी आहे "माझी मिळकत माझी आकारणी"च्या ऑनलाईन प्रक्रियेची संक्षिप्त माहिती :-

पायरी 1 : महानगरपालिकेच्या www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर भेट देवून, नागरीकांनी लॉगिन तयार करावे. त्यानंतर, संकेतस्थळावरील Citizen Services हा पर्याय निवडून Property Tax यामधील Self Assessment (स्व-मूल्यांकन) या सुविधेवर क्लिक करावे. त्यामध्ये, Self Assesment Form ओपन झाल्यानंतर नागरीकांनी नोंदणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे सोबत ठेवावी.

पायरी 2 : त्यानंतर Property Information यामध्ये Property Ward मध्ये आपली मिळकत महापालिकेच्या ज्या प्रभागात मोडत आहे तो प्रभाग नमुद करावा. Property Zone मध्ये आपली मिळकत महापालिकेच्या ज्या प्रभागात मोडत आहे तो Zone नमुद करावा. (प्रभाग / झोन निहाय परिसराची यादी कडोंमपा संकेतस्थळावरील Recent Announcement मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे) Road Type मध्ये दिलेले पर्याय निवडावे. Billing Method यामध्ये Whole किंवा Individual हा पर्याय निवडावा. First Assessment Date मध्ये मिळकतीची प्रथम मुल्यांकन तारीख नमुद करावी. Construction Permission No/Date,Construction Completion no/Date ची माहिती उपलब्ध असल्यास ती नमुद करावी. Property Type यामध्ये जमिन किंवा इमारतीचा पर्याय निवडावा.

पायरी 3 : Property holder Details मध्ये Single अथवा Joint पर्याय निवडावा. तसेच Property Address Details मध्ये Property Location Address यामध्ये मिळकतीचा संपूर्ण पत्ता नमुद करावा. Village मध्ये गावाचे/शहराचे नाव नमूद करावे. Servey No/City Servey No मधील माहिती भरावी.

पायरी 4 : Floor Details मध्ये Flat No, Floor No, Occupancy Type, Occupier Name , Legal/illegal, Construction Type, Usage Type, Usage subtype, Room यावर क्लिक करुन विचारणा केलेली माहिती भरुन Proceed करावे.

पायरी 5 : Document Uplod मध्ये विचारणा केलेले कागदपत्रे Upload करुन, Submit Assessment करावे. ही प्रकिया पुर्ण झाल्यानंतर Application Number उपलब्ध होईल. माझी मिळकत माझी आकारणी या उपक्रमातून मालमत्ता धारकांना स्वत: मालमत्तेची ऑनलाईन नोंदणी करता येणार असल्याने, नागरीकांनी याचा लाभ घ्यावा व कल्याण डोंबिवली महानगरपालिका शहराच्या विकासास हातभार लावावा असे आवाहन कर निर्धारण व संकलन विभागामार्फत करण्यात येत आहे.

## नेरुळ विभागात अतिक्रमणविरोधी कारवाई

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरुळ विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत श्री. कमलाकर म्हात्रे, घर क्र.464, नेरुळगाव, नेरुळ, नवी मुंबई, यांचे RCC फुटिंग, बिम व कॉलमचे काम अनधिकृतरित्या चालू होते. या अनधिकृत बांधकामधारकाला अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरुळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 54 अन्वये 22/03/2024 रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापी नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही.

सदर कारवाई सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे, कनिष्ठ अभियंता राजु हळंदे व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, 15 मजूर, 1 गॅस कटर, 4 ई हॅमर, 1 ब्रेकर च्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## सार्वजनिक सूचना

नोंद घ्या की, श्रीमती पोपारी शोभा या पुष्पा भवन को-ऑपरेटीव्ह हाऊसींग सोसायटी लि. च्या मुळ सदस्य असून त्यांचा पत्ता फ्लॅट क्र. ४१२, चौथा मजला, पुष्पा भवन को. हौ. सो. लि., टेलिफोन भवनच्या जवळ, कुलाबा, मुंबई-४००००५ असा आहे, यांनी उपरोक्त मालमत्ता / फ्लॅट श्री. मुलराज एन. भाटीया (डोसा) यांना भाड्याने दिला होता आणि ते १९५६ पासून श्री. नितीन डोसा यांच्यासोबत रहात होते. १९५६ पासून पुढे मुळ सदस्य लायसन्सींच्या संपर्कात नव्हत्या आणि उपरोक्त सोसायटीच्या अभिलेखामध्ये नॉमिनी / कायदेशीर वारस नमूद केला नव्हता. म्हणून पुढे माझ्या अशिलाने उक्त पत्त्यावरील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ४१२ श्री. नितीन डोसा यांच्या नावावर हस्तांतरणाकरिता या सूचने पासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये असे दावे आणि हरकतींसोबत आक्षेपाचे दावे मागविण्यासाठी दाव्याकरिता ही जाहीर सूचना वितरीत केली आहे, त्यानंतर प्राप्त झालेले दावे हरकती सोडून देण्यात येतील.

दिनांक : १९/०९/२०२४

हस्ता/-
शुभांगी सारंग
ॲडव्होकेट – मुंबई हायकोर्ट,
दर्शन हाईट्स, ६०९, ६वा मजला,
बी विंग, झावबावाडी, मुंबई-४००००२.

## माथेरान ‘टॉय ट्रेन‘ पावसाळ्यातही धावणार




■ माथेरान

मध्य रेल्वेकडून नेरळ-माथेरान कॉरिडॉर पुढील महिन्यांपासून सुरु होणार आहे. पावसाळ्याच्या महिन्यात माथेरान राणी अर्थात टॉय ट्रेनचा एक मार्ग बंद केला जातो. पावसाळ्यात डोंगरावरून वाहणाऱ्या पाण्यामुळे टॉय ट्रेन बंद ठेवली जाते. मात्र, यावर मध्य रेल्वेने तोडगा काढला आहे. मध्य रेल्वेकडून आता पाणी वाहणाऱ्या मार्गावर बांध घालण्यात येणार आहे. तसेच रुळावरील माती देखील साफ करण्याचं काम हाती घेण्यात आलं आहे. त्यानंतर टॉय ट्रेनची सेवा १५ ऑक्टोबरनंतर सुरु होणार आहे. मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, नेरळ-माथेरान मार्गावर पाणी वाहणाऱ्या मार्गावर बांध घालण्यात येत आहेत. पावसाळ्यात रुळावर जमा झालेले दगडही हटवण्यात येणार आहे. रुळावरील दगडामुळे टॉय ट्रेनचं नुकसान होतं. मध्य रेल्वेचे अधिकाऱ्यांनी सांगितलेल्या माहितीनुसार, माथेरानच्या डोंगरातून तळापर्यंत पाण्याचा प्रवाह सुरळीत होण्यासाठी चॅनल बसवण्यात येणार आहे. डोंगरावरील पाण्याचा प्रवाहाला योग्य मार्ग दिल्यास टॉय ट्रेनची सेवा पावसाळ्यातही सुरु राहणार आहे.

## पालघर नगरपरिषद, पालघर

ता. जि. पालघर

जाहीर निवेदन दरपत्रक / कोटेशन

पालघर नगरपरिषद मालकीच्या Force कंपनीच्या दोन रुग्नवाहीका सेवाभावी संस्थेस प्रायोगिक तत्वावर/भाडे तत्वावर चालवणेकामी देणेबाबत. इच्छुक संस्थेकडून दरपत्रक मार्गाविण्यात येत आहे. सदर दर सादर करतेवेळी रुग्णवाहीकेचा देखभाल दुरुस्ती इंधन, चालक यांचा खर्च मंजुर संस्थेस करावयाचा आहे. या सर्व बाबींचा विचार करुन विहित नमुन्यात दर सादर करण्यांत यावे. सदरची कोटेशन दिनांक ३०/०९/२०२४ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत या कार्यालयात समक्ष आणून द्यावीत. आलेले कोटेशन शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील. आलेली कोटेशन स्विकारणे अथवा सर्व कोटेशन नाकारणेचे अधिकार समक्ष समितीने राखून ठेवले आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होण्याच्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | वाहन नंबर | संख्या | प्रति महिना भाडे परतावा दर |
|---|---|---|---|
| पालघर नगरपरिषदेची Force कंपनीच्या दोन रुग्नवाहीका सेवाभावी संस्थेस प्रायोगिक तत्वावर चालविणेकामी देणेबाबत... | | | |
| १ | MH४८-CB-२१०९ | १ | |
| २ | MH४८-CB- २११० | १ | |
| | एकूण | २ | |

**अटी व शर्ती-**

१) पालघर नगरपरिषदेकडून पुरविण्यात येणाऱ्या वाहनांचे वेळोवेळी सर्व्हीसिंग करणे बंधनकारक राहील. २) पालघर नगरपरिषदेने मे. कौन्सिल सर्वसाधारण सभा दि. १७/०२/२०२३ तहकुब सभा दि. २१/०२/२०२३ रोजीच्या ठराव क्र. १४७ अन्वये केलेली दर निश्चिती पेक्षा अधिकचे दर आकारणी करण्यात येऊ नये याची खबरदारी घ्यावी. (निच्छीत केलेले दर नगरपरिषद कार्यालयात पाहावयास मिळतील) ३) सदर वाहनाचा येणारा खर्च (इंधन, सव्हींसींग, दुरुस्ती, चालक) संबंधित एजन्सीस करावा लागेल.

जावक क्र. पानप/ कार्या/६१२७/२०२४ २०२५
दि. १७/०९/२०२४

सही/-
मुख्याधिकारी
पालघर नगरपरिषद

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

(म्हाडा घटक)

म्हाडा MHADA

### निविदा सूचना

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी.एम.सी. फ. दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई - ४०००१२. कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या इमारतीच्या दुरुस्ती कामाकरीता सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून म्हाडा / सा.बा. विभाग / कै.सा. बां. वि/रल्वे/बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे सुशिक्षित बेरोजगार अभियंता या वर्गाच्या मुंबईतील नोदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी-१ [टक्केवारी दर] निविदा माविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | निविदा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | को-या निविदा विक्रीची रक्कम [ विना परतावा रु.१८% GST सह) | को-या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| १. | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली विशेष दुरुस्ती अंतर्गत विठठल सदन या \| पुनर्रचित इमारतीच्या सार्वजनिक शौचालय नं. ४ व खोली क्र. २१, ३१, ४६, ४७, ५१,५५, ६५, ७०, ८२ नाहणीची गळतीचे दुरुस्ती काम करणे खोली क्र. ०५, ७७, ७८,८२ सिपोरेक्स स्लॅब सार्वजनिक पॅसेज व जिना दुरुस्तीचे काम करणे. | ४,४३,२०९/- | ५०००.०० | ५९०.०० | दि. २५/०९/२०२४ ते दि. ०४/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. ०७/१०/२०२४ ते दि. ०८/१०/२०२४ सकाळी ११.०० दुपारी १.०० | १० महिने |

1. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकर सादर करणा-यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रककम ०८ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनाम बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
2. को- या निविदा योग्य त्या वर्गाच्या नोंदणाकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्याए पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
3. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नाव समाविष्ट नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
4. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सदर करावे.
5. निविदाकारांनी शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.०८/गृनिभू. दि. १४/०२/२०२४ चे पालन करावे.
6. को-या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता फ[द] विभाग, फ[द] विभाग तिसरा मजलाए अनेक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मंबई- १२. यांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे को-या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्यतो दि. ०८/१०/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ[द] विभाग मुं.इ. दु. व पु.मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
7. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारजी जाणार नाही.
8. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
9. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकारी सक्षम अधिका-यांकडे ठेवण्यात येत आहे.
10. मागविण्यात आलेली निविदा एसएसआर वर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अवगयी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल
11. . जी. एस. टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

CPRO/A/707

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता फ [द] विभाग
मुं.इ. दु. व. पु. मंडळ

## हिंजवडी शैक्षणिक संस्थांच्या परिसरात गांजा विक्री करणारे गजाआड

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरामध्ये गांजा विक्री करणाऱ्या तिघांना अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. आरोपींकडून १८ लाख रुपयांचा ३३ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. आरोपी हे धुळे येथून गांजा तस्करी करून पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागात विक्री करत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. याप्रकरणी सुरेंद्रकुमार संतोष त्रिपाठी, अशोक गुलाबचंद पावरा आणि पवन सानू पावरा या तिघांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांत, आयटी हब हिंजवडी आणि शैक्षणिक संस्था असलेल्या ठिकाणी आरोपी हे गांजा विक्री करत होते. याबाबतची माहिती अमली पदार्थ पथकाच्या पोलीस कर्मचाऱ्याला मिळाली. साहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड हे त्यांच्या पथकासह हिंजवडी आणि म्हाळुंगे परिसरात गस्त घालत असताना काही व्यक्ती संशयितरित्या फिरत असल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे विचारपूस करण्यात आली.



### म ह त्त्वा चे

## लष्करी अधिकाऱ्याच्या बंगल्यात चंदन चोरी

**पुणे :** शहरात चंदन चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, घोरपडी भागातील एका लष्करी अधिकाऱ्याच्या बंगल्यात शिरलेल्या चोरट्यांनी चंदनाचे झाड कापून नेले. चोरट्यांनी पर्वती भागातील मित्रमंडळ कॉलनीतील एका बंगल्यातील चंदनाचे झाड कापून नेल्याचे उघडकीस आले. याबाबत एका लष्करी अधिकाऱ्याने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार लष्करी अधिकाऱ्याचा घोरपडी परिसरातील नेहरू मार्गावर बंगला आहे. गुरुवारी मध्यरात्री चंदन चोरटे लष्करी अधिकाऱ्याच्या बंगल्यात शिरले. चोरट्यांनी आवारातील चंदनाचे झाड कापून नेले. बंगल्याच्या आवारातील चंदनाचे झाड कापून नेल्याचा प्रकार उघडकी आल्यानंतर पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक सांगोलकर तपास करत आहेत.

## बहिणीच्या प्रियकराची भावाने केली हत्या; तिघे ताब्यात

**पिंपरी :** बहिणी सोबत असलेल्या प्रेम संबंधाच्या कारणावरून भावाने प्रियकराची हत्या केल्याची घटना देहूरोडमध्ये घडली आहे. याप्रकरणी देहूरोड पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतलं आहे. अजय जोगिंदर लुक्कड असं हत्या झालेल्या तरुणाच नाव आहे. या घटने प्रकरणी कुणाल चंदू सकट, प्रेम सचिन मोरे आणि ओमकार उर्फ गणेश रवींद्र पवार अशी ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मुंबई-बंगळुरू महामार्गलगत असलेल्या देहूरोड परिसरातील डोंगराच्या पायथ्याशी खदानीमध्ये अजय चा आज मृतदेह आढळून आला. तातडीने पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. अजयची हत्या झाल्याचा पोलिसांनी संशय व्यक्त केला. पोलिसांनी अधिक तपास केल्यानंतर अजयचे आरोपी कुणाल चंदू सकट या तरुणाच्या बहिणीशी प्रेम संबंध असल्याचे समोर आलं. बहिणी सोबत असलेल्या प्रेम संबंधाच्या रागातून भाऊ कुणाल सकट याने इतर दोघांच्या मदतीने अजयला डोंगराच्या पायथ्याशी बोलवून खदानित ढकलून देऊन जीवे ठार मारल्याचं समोर आलेल आहे. याप्रकरणी तिघांना देहूरोड पोलिसांनी ताब्यात घेतल असून पुढील कारवाई पोलीस करत आहेत.

## 'युनेस्को' पथकाच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर प्रतापगडची स्वच्छता

**सातारा:** 'युनेस्को'द्वारा जागतिक वारसा स्थळ यादीत समावेश होण्यासाठी एक पथक राज्यातील किल्ल्यांची पाहणी करणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रतापगडावर स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा प्रारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ, कर्मचारी, शालेय विद्यार्थी, युवक मंडळे, हिलदरी संस्था, गाईड संघटना व हॉटेल संघटना संयुक्त वन व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत कुंभरोशी यांच्या वतीने किल्ल्याचा सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला. युनेस्कोद्वारा जागतिक वारसा स्थळ २०२४ यादित नामांकनाच्या यादीत समावेशासाठी एक पथक राज्यातील किल्ल्यांची पाहणी करणार आहे. यामध्ये प्रतापगडचा ही समावेश आहे. प्रतापगडाच्या पाहणीसाठी हे पथक लवकरच येणार आहे. गडावर पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. यामुळे गडावर पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक, कागद यांचा मोठा कचरा दिसून येतो.

# शिंदे सेनेत तिकिटासाठी 20 कोटी रुपये मागतात...

## ओबीसी नेते लक्ष्मण हाकेंचा खळबळजनक आरोप

प्रतिनिधी
■ जालना

एकनाथ शिंदे हे दोन नंबरचे धंदे करणाऱ्यांचे मुख्यमंत्री आहेत असा घणाघात लक्ष्मण हाके यांनी केला आहे. तसेच मिंधे गटात तिकिटासाठी 20 कोटी रुपये मागतात असा गंभीर आरोपही हाके यांनी केला. टीव्ही 9 या वृत्तवाहिनीने याबाबत वृत्त दिले आहे. हाके म्हणाले की, एकनाथ शिंदे यांना फक्त झेंडे लावायला, दसरा मेळाव्यात गर्दी करायला शिवसेना हवी आहे,



हाके म्हणाले की, एकनाथ शिंदे यांना फक्त झेंडे लावायला, दसरा मेळाव्यात गर्दी करायला शिवसेना हवी आहे, पण जेव्हा आमदारकी आणि खासदारकी द्यायची वेळ येते तेव्हा तिकिट मागणाऱ्यांनाच 20 कोटी रुपये मागितले जातात. वंदनीय बाळासाहेब ठाकरेंचे हे विचार होते का ? महाराष्ट्र ओरबाडून खाण्यासाठी एक टोळी निर्माण झाली आहे. सत्तेमधून पैसा आणि पैश्यांमधून सत्ता हे समीकरण सुरू आहे. यात ओबीसी आणि सर्वसामान्यांचे प्रश्न सुटलेले नाही. कंत्राटदार आणि दोन नंबरचा धंदा करणाऱ्यांचे शिंदे मुख्यमंत्री आहेत. यांना सामाजिक न्यायाची व्याख्यासुद्धा माहित नाही. महाराष्ट्र म्हटलं की समोर येतं की मराठा तितुका मेळवावा. पण मराठा तेवढाच मेळवावा आणि दलित, ओबीसी, भटका संपवावा हे धोरण शिंदे यांचे आहे. एकनाथ शिंदे ओबीसींसाठी एक शब्द बोलत नाही तुमची आम्हाला लाज वाटते असेही हाके म्हणाले.

# खेडमधील तरुणाच्या स्वप्नामुळे उलगडले जंगलातील मृतदेहाचे गूढ

प्रतिनिधी
■ खेड

ऑगस्ट महिन्यापासून माझ्या स्वप्नात एकजण येत आहे. मो माझ्याकडे मदत मागत आहे. तो कोठे आहे, ते जंगलातील ठिकाण असून, त्याच्या इमेज त्याने मला स्वप्नात दाखवल्या आहेत, असे म्हणत खेडमध्ये आलेला सिंधुदुर्गातील तरुण आठवडाभर खेडमध्ये होता. आपल्या या शोधकार्याचे पहिल्या दिवसापासूनचे व्हिडिओ त्याने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर अपलोड केले आहेत. त्यामुळे या प्रकरणातील गूढ वाढत चालले आहे.

आपल्या स्वप्नामध्ये येऊन एक तरुण आपल्याकडे मदत मागत आहे, अशी माहिती सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आजगाव येथील एका तरुणाने खेड पोलिसांना दिली. त्याआधारे पोलिसांनी शोध घेतला असता



खेड तालुक्यातील भोस्ते गावातील जंगलात एक मृतदेह पुरलेल्या अवस्थेत सापडला. तो मृतदेह पूर्ण सडला होता. एका तरुणाच्या स्वप्नांमुळे हे उघड झाल्याने याविषयाची मोठी चर्चा सुरू झाली आहे. तो मृतदेह कोणाचा आहे, इथपासून माहिती देणाऱ्या तरुणाभोवतीही गूढ वलय तयार झाले आहे. या तरुणाने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर गेल्या काही दिवसात अनेक व्हिडिओ टाकले आहेत. १६ ऑगस्टपासून माझ्या स्वप्नामध्ये एक तरुण येत आहे. त्याने रेनकोट घातला आहे. त्याच्या पायामध्ये काळे बूट आहेत. त्याच्याकडे एक बॅग आहे. तो कोण आहे, मला माहिती नाही. तो माझ्याकडे मदत मागतोय. त्याला मदत करण्यासाठी पाच दिवस मी खेडमध्ये फिरतोय. तो जसा गाईड करतोय, तसातसा मी फिरतोय. पण अजून हाती काहीच लागलेले नाही, असे या तरुणाने आपल्या व्हिडिओमध्ये म्हटले आहे.

गेल्या काही वर्षात भयंकर कृत्ये करायला लावणारे गेम इंटरनेटवर आले आहेत. हा तसाच काही 'टास्क' देण्याचा प्रकार आहे का, अशी शंकाही उपस्थित केली जात आहे. पोलिस सर्वच दृष्टीने या प्रकरणाची माहिती घेत आहेत.

पोलिसांना सापडलेली कवटी कोणाची आहे, तो मृतदेह कोणाचा होता याबाबतची माहितीही अजून पुढे आलेली नाही. त्यामुळे हे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे होत चालले आहे.

# उद्धव सेनेची अवस्था 'ना घरका ना घाटका'

प्रतिनिधी
■ कणकवली

महाविकास आघाडीत उद्धवसेना हा सावत्र भाऊ झाला आहे. त्यामुळे त्या पक्षाची 'ना घरका ना घाटका'अशी अवस्था झाली आहे. काँग्रेस आणि तुतारी समोर कितीही नाक रगडले तरी उद्धव ठाकरे यांना या जन्मात तरी मुख्यमंत्री पद परत मिळणार नाही असा टोला आमदार नितेश राणे यांनी लगावला. कणकवली येथे ओम गणेश निवासस्थानी शुक्रवारी त्यांनी प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधला.



नितेश राणे म्हणाले, काँग्रेस समोर किती छाती फुगवली तरी महाविकास आघाडीच्या बैठकीत काँग्रेस आणि तुतारीवाले उद्धवसेनेला किंमत देत नाहीत. लोकसभा निवडणुकीत उद्धवसेनेचा स्ट्राइक रेट सर्वात खराब आहे. त्यामुळे संजय राऊत यांनी आपल्या पात्रतेनुसारच बोलावे असाही सल्ला राणे यांनी दिला.

ते पुढे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यावर टीका करताना गुजरातवर घसरणाऱ्या संजय राऊत यांचे पक्षप्रमुख गुजरातला जातात, गुजराती माणसाच्या लग्नात हजेरी लावतात. मात्र, राऊत यांना सोबत नेत नाहीत. त्यांची कोणाशी ओळख करून देत नाहीत. त्यामुळे संजय राऊत जळत आहेत. त्यांना हे खटकते. त्यामुळे गुजराती लोकांवर संजय राऊत उठसूठ टीका करत असल्याचेही राणे म्हणाले.

# 3 शाळकरी मुलांना ठार मारण्याचा प्रयत्न

## कासव असल्याचे सांगत विकृताने विहिरीत ढकलले

प्रतिनिधी
■ नाशिक

अल्पवयीन तीन शाळकरी मुलांना विहिरीत ढकलून ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सिन्नर तालुक्यातील वडगाव पिंपळे येथील या घटनेने संताप व्यक्त होत आहे. सुदैवाने या तिन्ही शाळकरी मुलांचा जीव वाचला आहे.

वराद घुगे, अथर्व घुगे आणि आदित्य सानप घराच्या अंगणात खेळत असताना संशयित अमोल लांडगे, विक्रम माळी, साईनाथ ठमके यांनी बाजूच्या विहिरीत कासव आहे, तुम्हाला दाखवतो असे मुलांना म्हटले. त्यानंतर मुले कासव पाहण्यासाठी विहिरीत डोकावली



असता त्यांना विहिरीत ढकलून दिले व तिथून पळ काढला. विहिरीत पडल्यानंतर त्यांच्यातील एका मुलाने विद्युत पंपाला बांधलेली दोरी पकडत इतर दोघांनाही सावरल्याने तिघांचाही जीव वाचला. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे. जीव वाचवून घरी आल्यानंतर मुलांनी घडलेला सर्व प्रकार पालकांना सांगितला. दुसऱ्या दिवशी पालकांनी पोलीस ठाणे गाठत अमोल लांडगे, विक्रम माळी, साईनाथ ठमके यांच्याविरोधात तक्रार दाखल केली. पालकांच्या फिर्यादीवरून सिन्नर पोलिसांनी अमोल लांडगे याच्याविरोधात कट रचून मुलांना ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तर इतर दोघे फरार असून त्यांचाही शोध पोलीस घेत आहेत. जीवे मारण्याच्या उद्देशाने या मुलांना विहिरीत ढकलल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. याप्रकरणाचा अधिक तपास पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक रुपाली चव्हाण, संजय गोसावी, अमोल शिंदे करत आहेत. फरात झालेल्या संशयित गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी पथके पाठवली असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# अल्पवयीन मुलींना दारू पाजत मित्रांनेच केला सामूहीक अत्याचार

प्रतिनिधी
■ बारामती

बारामतीतील दोन अल्पवयीन मुलींना दारू पाजत सामूहीक अत्याचार केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. पुण्यातील हडपसर परिसरात अत्याचार केल्याचे समोर आले असून सदर प्रकरणी तिघांना अटक केली असून एक फरार आहे. या घटनेनं बारामतीत मोठी खळबळ उडाली आहे. ज्ञानेश्वर भरत आटोळे (वय २७, रा. सावळ), अनिकेत प्रमोद बेंगारे (वय २०, रा. बयाजीनगर, रुई, बारामती) आणि यश उर्फ सोन्या शिवाजी आटोळे (वय २१, रा. सावळ, ता. बारामती) अशी पोलिसांनी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांना बारामती न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

१४ सप्टेंबर रोजी म्हणजे शनिवारी दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याच्या वेगवेगळ्या फिर्यादी बारामती तालुका पोलिस ठाण्यात दाखल झाल्या होत्या. त्यानुसार पोलिसांनी अज्ञातांविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. या दोघी मुली शहरातील वेगवेगळ्या शाळांमध्ये नववीमध्ये शिक्षण घेत आहेत. परंतु त्या एकमेकींच्या मैत्रिणी आहेत. त्या दि. १४(शनिवारी) रोजी घरात कोणाला काहीही न सांगता निघून गेल्या. बसने त्या पुण्यात पोहोचल्या. जाताना त्यांनी ज्ञानेश्वर आटोळे याच्याशी संपर्क साधला. त्याने हडपसर परिसरातील दोघा मित्रांना या मुली येत असल्याचे सांगितले.

मुलींपाठोपाठ तो ही बारामतीतून हडपसरला गेला. तेथे एका मित्राच्या खोलीवर या मुलींना नेण्यात आले. रात्री त्यांना दारु पाजून या तिघांसह अन्य एका फरार आरोपीने त्यांचे आळीपाळीने लैंगिक शोषण केले. दरम्यान यातील एका मुलीने हडपसरहून तिच्या आईला फोन केला. आईने बारामती तालुका पोलिसांना याची माहिती दिली. त्यानुसार तालुका पोलिसांनी हडपसर पोलिसांशी संपर्क साधला. बारामतीतून महिला पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांसह एक पथक हडपसरकडे रवाना झाले.

# मनोज जरांगेंची प्रकृती खालावली, रक्तातील शुगर कमी, चालताही येईना

प्रतिनिधी
■ जालना

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी सलग सहाव्यांदा आमरण उपोषण सुरू केलेय. चार दिवसांपासून मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरु आहे. पाणी आणि अन्नाचा पोटात कणही गेला नाही. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यात त्यांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांना प्रचंड प्रमाणात थकवा जाणवत आहे. त्यांना चालताही येत नाही.

मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर जरांगे यांनी उपोषणाचं हत्यार उपसल्याने सरकारची मोठी कोंडी होण्याची शक्यता आहे. मनोज जरांगे मागील चार दिवसांपासून उपोषणाला बसले



आहेत. त्यांची प्रकृती खालावत चालली आहे. रक्तातील साखरेचे प्रमाण कमी झाल्याने थकवा जाणवत आहे.

रक्तातील साखरेचे प्रमाण कमी झाल्याने मनोज जरांगे यांना मोठ्या प्रमाणात थकवा जाणवत आहे. त्यांना उपोषण स्थळावरून खाली उतरताना चालताही येत नव्हते. उपोषण स्थळाच्या पायऱ्याखाली उतरले पण त्यांना थकवा आला. त्यामुळे मनोज जरांगे पाटील हे थकवा जाणवत असल्याने खाली बसले. मनोज जरांगे यांना उपचार घेण्याची डॉक्टरानी विनंती केली होती, मात्र मनोज जरांगे यांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे. तुम्ही फडणवीसांच ऐकून गेम करायलेत का? मनोज जरांगे यांनी तपासणीसाठी आलेल्या डॉक्टरांना झापले. डॉक्टर सुद्धा सरकारच ऐकून आमचा गेम करायला लागले का ? माझी तब्बेत मेंटन असल्याची खोटी माहिती तुम्ही सरकारला देतायत. माझी शुगर कमी होण्याऐवजी वाढली कशी.? असे म्हणत मनोज जरांगे यांनी डॉक्टरांना धारेवर धरले. आज दुपारी मनोज जरांगेंच्या उपाचारासाठी डॉक्टरांचे पथक आले होते. यावेळी जरांगे यांनी तपासणीसाठी आलेल्या डॉक्टरांना चांगलंच झापलंय. माझा शुगर उपोषणाला बसताना 70 होता मग हा शुगर 83 कसं झालं? असा सवाल उपस्थित करत जरांगे यांनी वैद्यकीय पथकाला जाब विचारला. तुम्ही तुम्ही फडणवीसांच ऐकून गेम करायलेत का असा सवालही जरांगे यांनी डॉक्टरांना केला.

# नाथसागरातील पाण्यासाठी लोक लढा

## बीडच्या १४० गावांचा सहभाग



प्रतिनिधी
■ बीड

बीड जिल्ह्यातील सिंदफणा काठच्या १४० गावांसाठी नाथसागरातील पाणी सोडावे. या मागणीसाठी आता ग्रामस्थांनी लढा उभारला आहे. यासाठी गावोगावी बैठकांचे आयोजन केले जात असून या संदर्भात मुख्यमंत्र्यांची देखील भेट घेतली जाणार आहे.

बीड जिल्ह्यातील पैठण येथील नाथसागरातील पाणी अंडरग्राउंड पाईप लाईनद्वारे सिंदफणा नदीपात्रात सोडल्यास १४० गावांना शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध होऊ शकणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होणार आहे. यासाठी ३० किलोमीटरची पाईपलाईन करणे गरजेचे आहे. याबाबत सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, या मागणीसाठी हा लोकलढा उभारला जात आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी छत्रपती संभाजीनगरमध्ये याच प्रश्नावर उपोषण देखील करण्यात आले. दरम्यान आता शिष्टमंडळाच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली जाणार आहे. त्यानंतरही या प्रश्नावर कुठलीही सकारात्मक कार्यवाही न झाल्यास थेट रस्त्यावर उतरून ५० हजार गावकऱ्यांचा मोर्चा काढण्याचा इशारा देखील या समितीने दिला आहे.

# रस्ता खचला, पुणे पालिकेचा ट्रक खड्ड्यात गाडला गेला

प्रतिनिधी
■ पुणे

पुण्यातील बेलबाग चौकाजवळच सिटी पोस्ट कार्यालय आहे. मैलापाणी वाहिन्यांबाबत तक्रारी आल्याने महापालिकेकडून संबंधित वाहिन्या दुरूस्तीचे काम सुरू होते. मात्र या दुरुस्तीसाठी गेलेला महापालिकेचा ट्रक थेट २५ फूट खोल खड्ड्यात कोसळल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. शुक्रवारी दुपारी चारच्या सुमारास ही घटना घडली असून सुदैवाने यात कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र सध्या महापालिकेच्या या कामाची शहरात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

बेलबाग चौक परिसरात मैलापाणी वाहिन्यांबाबत काही दिवसांपासून अनेक तक्रारी येत होत्या. त्यामुळे महापालिकेने आज संबंधित वाहिन्या दुरूस्तीचं काम सुरू केलं होतं. शुक्रवारी दुपारी चारच्या



सुमारास महापालिकेकडून मैलापाणी वाहिनी दुरूस्तीसाठी ठेकेदाराचा ट्रक व कामगारांना या भागात पाठवण्यात आलं होतं. ट्रक आणि कामगार सिटी पोस्ट कार्यालयात पोहोचले आणि चेंबरमधील कामाला सुरुवात केली. बाजूलाच महापालिकेचा ट्रक थांबला होता.

काम सुरू असताना अचानक ट्रक थांबलेल्या ठिकाणची जमीन खचली आणिल ट्रक सरळ २५ फूट जमिनीत गेला. ट्रकचा केबीनचा भाग वगळता संपूर्ण ट्रक जमीनीत गाडला गेला. ट्रक चालकाने प्रसंगावधान राखत ट्रकमधून बाहेर उडी घेतल्याने त्याचा जीव वाचला.

ट्रकखाली मोठा खड्डा पडला होता आणि त्यात मोठ्या प्रमाणात पाणीही साचलं. त्यामुळे संपूर्ण ट्रक पाण्यात बुडाला. अखेर हा ट्रक बाहेर काढण्यासाठी अग्नीशमन दलाला पाचारण करावं लागलं. काही वेळातच अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि खड्ड्यात पडलेल्या ट्रक काढण्याचं काम सुरू केलं आहे, अशी माहिती अग्निशामक दलाचे अधिकारी सुहास जाधव यांनी दिली.

# बांदा येथे काका-पुतण्याचे एकाच दिवशी निधन

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

डोंगरआळी येथील व सध्या मुंबई येथे वास्तव्यास असलेल्या काका व पुतण्याचे एकाच दिवशी अल्पशा आजाराने निधन झाले. ही घटना काल सकाळी घडली. नारायण यशवंत सावंत-पटेकर (वय ३४) यांचे तर सायंकाळी उशिरा



काका सुरेश रामचंद्र सावंत-पटेकर (वय ७४) यांचे खासगी रुग्णालयात निधन झाले. काका पुतण्याचे निधन झाल्याने पटेकर कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. नारायण यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, १० महिन्यांची मुलगी असा परिवार आहे. तर सुरेश सावंत यांच्या मागे पत्नी, मुलगा, दोन मुली, जावई असा परिवार आहे.

# कोकण विकासासाठी समृद्ध कोकण संघटना स्वराज्यभूमीचे आंदोलन

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

महाराष्ट्राला सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या कोकणाला विकासाचा सर्वाधिक निधी मिळाला पाहिजे या मागणीसह एकूण दहा मागण्यांसाठी समृद्ध कोकण संघटनेच्या स्वराज्यभूमी आंदोलन यामार्फत रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे.

या आंदोलनाच्या पहिल्या दिवशी जवळपास ५०० शेतकरी, आंबा बागायतदार, पर्यटन व्यावसायिक यांनी सहभाग घेतला. कुडाळ, मालवण, देवगड, दापोली, गुहागर, संगमेश्वरपासून रत्नागिरीपर्यंत जवळपास प्रत्येक




तालुक्यातून कार्यकर्ते आवर्जून यावेळी उपस्थित होते. धोंडू शिंदे हे ८६ वर्षाचे शेतकरी आंदोलनात सहभागी झाले. संजय यादवराव, बावाशेठ साळवी – रत्नागिरी, संदीप शिरधनकर गुहागर, युयुत्सु आर्ते संगमेश्वर, संदेश साळस्कर देवरुख, जवळपास १० तरुणांनी एकावेळी उपोषण सुरू केले आहे. कोकणाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि रास्त मागण्या मान्य होईपर्यंत हे आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

माकडांवरील नियंत्रण, आंबा बागायतदार व मच्छीमार कर्जमाफी, राज्याला सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या कोकण प्रदेशाला सर्वाधिक विकासाचा निधी मिळाला पाहिजे व तो योग्य ठिकाणी खर्च झाला पाहिजे. यासाठी अप्पर जिल्हाधिकारी बर्गे यांची भेट घेवून त्यांना आंदोलनाच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

# माजी कसोटीपटू विक्रम राठोड राजस्थानचे फलंदाजी प्रशिक्षक

**जयपूर :** भारतीय संघाचे माजी फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड यांची आयपीएल फ्रँचायझी राजस्थान रॉयल्सने फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. आयपीएल फ्रँचायझीने आपल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की 55 वर्षीय माजी भारतीय सलामीवीर त्यांचे फलंदाजी प्रशिक्षक असतील.भारतासाठी 6 कसोटी आणि 7 एकदिवसीय सामने खेळलेल्या विक्रम राठोडने राजस्थान रॉयल्सला सांगितले की, रॉयल्स कुटुंबाचा भाग बनणे हा बहुमान आहे. मला पुन्हा एकदा राहुलसोबत आणि आता युवा क्रिकेटपटूंसोबत काम करण्याची संधी मिळाली आहे. मी संघाची दृष्टी आणि रॉयल्ससाठी अव्वल दर्जाचे खेळाडू तयार करण्यात मदत करेन, ज्यामुळे संघाला आयपीएल विजेता बनविण्यात मदत होईल.



# चेन्नई कसोटीत भारताची 308 धावांची आघाडी

## बांगलादेशचा पहिला डाव 149धावांत कोसळला

वृत्तसंस्था
■ चेन्नई

भारत आणि बांगलादेश यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना चेन्नईत खेळवला जात आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारताने दुसऱ्या डावात 3 विकेट गमावून 81 धावा केल्या होत्या. भारताने पहिल्या डावात 227 धावांची आघाडी घेतली होती, आता त्यांची आघाडी 308 धावांवर पोहोचली आहे. ऋषभ पंत 12 धावा करून नाबाद तर शुभमन गिल 33 धावा करून परतला.

तत्पूर्वीभारतीय कर्णधार रोहितने पाहुण्यांना फॉलोऑन न देता दुसरा डाव खेळण्याचा निर्णय घेतला.दुसऱ्या डावात रोहित शर्मा 5 धावा करून, यशस्वी जैस्वाल 10 आणि विराट कोहली 17 धावा करून बाद झाला. बांगलादेशकडून आतापर्यंत मेहदी



हसन मिराज, नाहिद राणा आणि तस्कीन अहमद यांनी 1-1 फलंदाज बाद केला.

विराट कोहली दुसऱ्या डावातही मोठी खेळी खेळू शकला नाही. तो 17 धावा करून बाद झाला. मेहदी हसन मिराझचा फुल बॉल कोहलीच्या पॅडला लागला, जोरदार अपील होते, अंपायरने आऊटचा इशारा दिला. कोहलीने रिव्ह्यू घेतला नाही, घेतला असता तर जीवदान मिळाले असते. बॅटला आदळल्यानंतर चेंडू पॅडला लागल्याचे रिप्लेमध्ये दिसून आले.

# बुमराह चारशे पार; कपिल, शमी, झहीर यांच्या पंक्तीत स्थान

वृत्तसंस्था
■ चेन्नई

भारतीय क्रिकेट संघाचा 'यॉर्कर किंग' आणि स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने चेन्नई येथे बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात आपल्या क्रिकेट कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा गाठला. बुमराहने पहिल्या डावात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४०० विकेट पूर्ण केले आणि अशी कामगिरी करणारा तो सहावा भारतीय वेगवान गोलंदाज ठरला. बुमराहने हरभजन सिंगला मागे टाकलं आहे.

बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या डावात ९ धावा करत खेळत असलेल्या हसन महमूदला विराट कोहलीकरवी झेलबाद करताच बुमराहने आंतरराष्ट्रीय



क्रिकेटमधील ४०० विकेट्स पूर्ण केले. अशी कामगिरी करणारा बुमराह सहावा भारतीय वेगवान गोलंदाज ठरला. कपिल देव, झहीर खान, जवागल श्रीनाथ, मोहम्मद शमी आणि इशांत शर्मा हे भारतीय गोलंदाज आहेत, ज्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४०० किंवा त्याहून अधिक विकेट घेतले आहेत. आता या महान खेळाडूंच्या यादीत बुमराहही सामील झाला आहे.

### असा पराक्रम करणारा सहावा भारतीय वेगवान गोलंदाज

***आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणारे भारतीय वेगवान गोलंदाज***

*६८७ – कपिल देव*
*६१० – झहीर खान*
*५५१ – जवागल श्रीनाथ*
*४४८ – मोहम्मद शमी*
*४३४ – इशांत शर्मा*
*४०० – जसप्रीत बुमराह*

***भारतासाठी सर्वात कमी डावात ४०० आंतरराष्ट्रीय विकेट घेणारे गोलंदाज***

*२१६ – रविचंद्रन अश्विन*
*२२० – कपिल देव*
*२२४ – मोहम्मद शमी*
*२२६ – अनिल कुंबळे*
*२२७ – जसप्रीत बुमराह*
*२३७ – हरभजन सिंग*

# रॉय, होप, फर्ग्युसन, वेड, शेफर्ड, ॲटकिन्सन, झद्रान आणि फखर ILT20 सीझन 3 मध्ये खेळणार

प्रतिनिधी
■ मुंबई

झी एंटरटेन्मेंटद्वारे प्रसारित होणारा DP वर्ल्ड इंटरनॅशनल लीग T20 चा सीझन 3, त्याच्या सहा फ्रँचायझींमध्ये सर्वात मोठी नावे जोडली असून, एकदम थ्रिलिंग क्रिकेट अनुभवाचे वचन देतो. नवीन खेळाडूंना घेण्याची प्रक्रिया जूनमध्ये सुरू झाली आणि रविवार, 15 सप्टेंबर रोजी संपली.

डीपी वर्ल्ड ILT20 च्या सीझन 3 मध्ये जेसन रॉय (शारजाह वॉरियर्स), फखर जमीन (डेझर्ट वायपर्स), शाई होप (दुबई कॅपिटल), लॉकी फर्ग्युसन (डेझर्ट वायपर्स), रोस्टन चेस (अबू धाबी नाइट रायडर्स), मॅथ्यू वेड (शारजाह वॉरियर्स), इब्राहिम झदरान (गल्फ जायंट्स) यांसारखे आंतरराष्ट्रीय टी-20 स्टार असतील, तर रोमॅरियो शेफर्ड (एमआय एमिरेट्स) या स्पर्धेत पदार्पण करत आहे. हे क्रिकेटपटू अबूधाबी, दुबई, तसेच शारजाह येथे आपला खेळ दाखवतील, यामुळे चाहत्यांना चांगलीच मेजवानी मिळेल.

ऑस्ट्रेलियन पॉवर हाउस, डेव्हिड वॉर्नर आणि श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाका यांच्यासह जगातील काही प्रमुख क्रिकेट स्टार सीझन 3 मध्ये खेळणार आहेत. त्यांच्यासोबत सुनील नरेन, आंद्रे रसेल, ड्वेन ब्राव्हो, किरॉन पोलार्ड आणि रोव्हमन पॉवेल यांसारखे वेस्ट इंडिजचे दिग्गज खेळाडूही सहभागी होतील. जे आपल्या अष्टपैलू खेळणे या स्पर्धेत अधिक रंगत आणतील. या लीगमध्ये सिकंदर रझा, ख्रिस जॉर्डन, जेम्स विन्स, शिमरॉन हेटमायर आणि निकोलस पूरन यांच्यासह गेल्या हंगामातील काही गुणी खेळाडूंचा समावेश असेल, तर कुसल मेंडिस आणि टॉम कोहलर-कॅडमोर या प्रमुख खेळाडूंना कायम ठेवण्यात आले आहे.

आशिष सहगल, मुख्य विकास अधिकारी - डिजिटल आणि ब्रॉडकास्ट महसूल - झी एंटरटेन्मेंट एंटरप्राइझ



लिमिटेड, म्हणाले,"जगातील काही उत्कृष्ट खेळाडूंचा समावेश असलेल्या सीझन 3 चे अनावरण करताना Zee ला आनंद होत आहे. अबुधाबी, दुबई आणि शारजाह यांसारख्या प्रतिष्ठित स्थानांसह, तसेच जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांची व्यवस्था आणि सहा पॉवरहाउस फ्रँचायझीसह आमचे उद्दिष्ट गेल्या दोन हंगामातील यशापेक्षाही जास्त यशस्वी होण्याचे आहे आणि सर्वाधिक फॉलो केल्या जाणाऱ्या जागतिक क्रिकेट स्पर्धांपैकी एक असल्याने लीगला मजबूत करणे हे आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील ही प्रसिद्ध स्पर्धा असल्याने, हा रोमांचकारी खेळ सादर करण्यास आम्ही उत्सुक आहोत." सीझन 3 मध्ये खेळणाऱ्या अन्य खेळाडूंमध्ये न्यूझीलंडचा वेगवान ॲडम मिल्ने, अनुभवी यष्टिरक्षक-फलंदाज टिम सेफर्ट (न्यूझीलंड), ऑस्ट्रेलियाचा डावखुरा फिरकीपटू ॲश्टन आगर (ऑस्ट्रेलिया संघातील सदस्य – ICC पुरुष T20 विश्वचषक 2024), अफगाणिस्तानचा अष्टपैलू करीम जनात (अफगाणिस्तान संघाचे सदस्य – ICC पुरुष T20 विश्वचषक 2024, गल्फ जायंट्स सीझन 2), वेस्ट इंडिजचा अष्टपैलू खेळाडू कीमो पॉल, श्रीलंकेचे अविष्का फर्नांडो आणि भानुका राजपक्षे (दुबई कॅपिटल सीझन 1, एमआय एमिरेट्स सीझन 2), ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू डॅनियल सॅम्स (सीझन 3 साठी पुन्हा नियुक्त), USA चा डावखुरा फिरकीपटू हरमीत सिंग आणि मलेशियाचा अष्टपैलू विरनदीप सिंग यांचा समावेश आहे.

# बीओबी बॅडमिन्टन; ऋग्वेद, ऋषिकेश, अजिंक्यची विजयी सलामी

■ मुंबई

बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागीय बॅडमिन्टन निवड चाचणी स्पर्धेमध्ये पुरुष एकेरीत ऋग्वेद फराडे, ऋषिकेश शिंदे, अजिंक्य नवगिरे, अरविंद अगरवाल, राजेश कुमार आदींनी सलामीचे सामने जिंकले. अतिशय चुरशीच्या सामन्यात ३-० असा दमदार प्रारंभ करणाऱ्या ऐश्वर्य मिश्राचे आव्हान उशिरा सूर सापडलेल्या ऋग्वेद फराडेने १५-११ असे संपुष्टात आणले आणि दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. सदर स्पर्धेमधून पहिले चार विजेते-उपविजेते खेळाडू १७ व १८ ऑक्टोबर रोजी



राजकोट येथे होणाऱ्या अखिल भारतीय बीओबी बॅडमिन्टन स्पर्धेमध्ये मुंबई विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागतर्फे आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने दादर-पश्चिम येथे आयोजित बीओबी बॅडमिन्टन निवड चाचणी महिला एकेरीत पूजा मोरेने पी. लोकेश्वरीचा ११-४, ११-३ असा तर गरिमा श्रीवास्तवने के. प्रवाल्लिकाचा ११-५, ११-३ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरी जिंकली. पुरुष एकेरीत प्रारंभी जोरदार मुसंडी मारणाऱ्या श्रीणु मुदावाथला ऋषिकेश शिंदेने १५-८ असे हरवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

अन्य सामन्यात अजिंक्य नवगिरेने सुश्रुत सोनकुसलेवर १५-६ असा, अरविंद अगरवालने झुबीन पुजारावर १५-३ असा, अविनाश नारल्लाने वासुदेववर १५-५ असा, दिव्यारंजन आचर्यने सचिन गुदलमाणीवर १५-६ असा, राजेश कुमारने चंदन बर्न्वलवर १५-५ असा आणि एन. शिवाने सौरभ सिंगवर १५-५ असा विजय मिळविला.

# माहीम जुवेनील चषक मोफत कॅरम स्पर्धा 25 सप्टेंबरला

प्रतिनिधी
■ मुंबई

माहीम जुवेनील स्पोर्ट्स क्लब-शिवाजी पार्क व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे शालेय-कॉलेजमधील १८ वर्षाखालील मुलांची विनाशुल्क कॅरम स्पर्धा २५ सप्टेंबर रोजी माहीम जुवेनील पव्हेलीयन, शिवाजी पार्क मैदान येथे आयोजित करण्यात आली आहे. माजी केंद्रीय राज्यमंत्री आनंदराव अडसूळ वाढदिवस चषक सुपर लीग कॅरम स्पर्धेवेळी ज्युनियर कॅरमपटूंनी केलेल्या आग्रहाखातर लागोपाठ तिसऱ्या वर्षी माहीम जुवेनील स्पोर्ट्स क्लबने स्पर्धा भरविण्याचे ठरविले आहे. विजेत्या-उपविजेत्यांना एकूण १६ आकर्षक चषक-मेडल व स्ट्रायकर पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती क्लबचे खजिनदार महेश शेटे यांनी दिली.

शालेय-महाविद्यालयीन मुख्य कॅरम स्पर्धेअगोदर स्पर्धात्मक सराव मिळण्यासाठी मुंबई शहर व उपनगर, ठाणे,रायगड, पालघर आदी जिल्ह्यातील ज्युनियर खेळाडू उत्सुक आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी चॅम्पियन कॅरम बोर्डावर दर्जेदार स्पर्धेचे पूर्णपणे मोफत आयोजन होणार असून माहीम जुवेनील स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष विजय येवलेकर व सेक्रेटरी सुनील पाटील आणि आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते आदींनी पुढाकार घेतला आहे. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या संबंधीत खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा क्रीडापटू चंद्रकांत करंगुटकर (९९८७८ ३१६२२) यांच्याकडे २२ सप्टेंबरपर्यंत संपर्क साधावा.

# स्वच्छता हीच सेवा मोहिमेंतर्गत महापालिकेच्यावतीने केएलई महाविद्यालयात क्रिकेट स्पर्धांचे आयोजन

प्रतिनिधी
■ पनवेल

स्वच्छ भारत अभियानाच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय , केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा' मोहीम राबविण्यात येत आहे. "स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता" या संकल्पनेसह स्वच्छता ही सेवा मोहीमेंतर्गत आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोलीतील केएलई महाविद्यालयात क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छतेच्या प्रयत्नांमध्ये सामूहिक कृती आणि नागरिकांची शहर स्वच्छतेतील सहभागाची



भावना प्रज्वलित करण्यासाठी स्वच्छता ही सेवा मोहीम आयोजित करण्यात आलेली आहे. या मोहिमेंतर्गत कळंबोलीतील केएलई महाविद्यालयात क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये 11 टिम सहभागी झाल्या होत्या. स्वच्छतेचे महत्व सांगणारे बॅनर्स यावेळी सर्वत्र लावण्यात आले होते.

यावेळी केएलई महाविद्यालयाचे प्राचार्य विजय मेंडूलकर , महापालिकेचे अधिकारी अमित जाधव , शितल घारगे, कर्मचारी उपस्थित होते.

स्वच्छता हीच सेवा या मोहिमेंतर्गत 17 सप्टेंबर पासून दिनांक 2 ऑक्टोबर या कालावधीत पालिका क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी स्वच्छता ही आपली जीवपपध्दती बनविण्यासाठी प्रतिज्ञा करून स्वच्छ भारत अभियानामध्ये सहभागी होण्याचे आवाहन घनकचरा व आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले आहे.

# बृहन्मुंबई महानगरपालिका कामगार कर्मचाऱ्यांना 20 टक्के सानुग्रह अनुदान द्या

## पालिकेतील कामगार संघटनांच्या समन्वय समितीची आयुक्तांकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

सन २०२३-२४ या वर्षासाठी महापालिका कामगार-कर्मचारी-अधिकारी तसेच सर्व विभागातील कंत्राटी कामगार यांना दिवाळी सणासाठी एकूण वार्षिक वित्तलक्षीच्या किमान २० टक्के सानुग्रह अनुदान (बोनस) विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा व तो दिवाळी पूर्वी देण्यात यावा अशी मागणी पालिकेतील विविध कामगार संघटनांच्या "मुंबई महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना समन्वय समितीच्या वतीने पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे काल पत्राद्वारे केली आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी कामगार, कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी, अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, परिचारिका, परिसेविका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मयारी, सुरक्षा रक्षक, अग्नीशमन दलातील कर्मचारी इत्यादी कायम कामगारांबरोबर महनगरपालिकेतील विविध खात्यातील कंत्राटी, रोजंदारी कामगार, बहुउद्देशीय कामगार, आरोग्य खात्यातील कंत्राटी कामगार, सी.टी. सी. बोरीवली रुग्णालयातील कर्मचारी, आर.सी. एच.-२, एनयुएबएम कर्मचारी, मुंबई एड्स कंट्रोल सोसायटी कर्मचारी, बालवाडी शिक्षिका व मदतनीस, अंशकालिक कर्मचारी, स्वच्छ मुंबई अभियान मधील कंत्राटी कामगार, सर्व समग्र शिक्षा अभियान कर्मचारी, मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्थेतील कर्मचारी तसेच आरोग्य खात्यातील स्वयंसेवी आरोग्यसेविका (सी. एय.व्ही.) यांना एकूण वार्षिक वित्तलब्धीच्या किमान २०% सानुग्रह अनुदान (बोनस) देण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

म.न.पा. कामगार-कर्मचारी-अधिकाऱ्याऱ्यांना दिवाळी सणासाठी देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदान (बोनस) च्या रक्कमेतून आयकर व इतर कर सरसकट न कापता कर्मचाऱ्यांच्या पगारातुन आयकर वळता केला जातो त्याच धर्ति धर्तीवर मार्च २०२५ पर्यंत कर्मचाऱ्याच्या पगारातुन समान विभागणी करून कापण्यात यावा, अशी विनंतीही आयुक्तांना करण्यात आली आहे. हा विषय तातडीचा समजून आपल्या दालनात सर्व संबंधित अधिका-यांसमवेत बैठकीचे त्वरीत आयोजन करून सदर बैठकीची वेळ व तारीख समन्वय समितीला लवकरात लवकर कळवावी, अशी विनंतीही कामगार नेत्यांनी आयुक्तांना केली आहे.

या पत्रावर अँड. महाबळ शेट्टी म्युनिसिपल मजदूर युनियन, वामन कविस्कर, अशोक जाधव (मुंबई, म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशन व संलग्न संघटना) बाबा कदम, सत्यवान जावकर (म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना मुंबई) अँड. प्रकाश देवदास, बा. शि. साळबी (मुं.म.का.क. संघटना व मनपा आरोगय संघटना मुंबई महानगरपालिका कर्मचारी महासंघ) दिवाकर दळवी( हिंदुस्तान कर्मचारी संघ) साईनाथ राजाध्यक्ष, संजीवन पवार, शेषराव राठोड (म्युनिसिपल कामगार संघ)शरद सिंह यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आ. लांडेंच्या नेतृत्वाखाली सुनील केदारांच्या वक्तव्याचा शिवसैनिकांकडून निषेध

## शिवसेना चांदिवली विधानसभेच्या वतीने काँग्रेस नेते केदार यांच्या विरोधात विभागात निर्दर्शने




■ मुंबई

काँग्रेस नेते माजी मंत्री सुनील केदार यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद करण्यासंबंधीचे केलेले वादग्रस्त वक्ताव्यामुळे सत्ताधारी शिवसेना चांगलीच आक्रमक झाली असून मुंबईसह राज्यभरात सुनील केदार यांच्या विरोधात निषेध आंदोलन केली जात आहेत. चांदिवली विधानसभा क्षेत्रातील शिवसेनेचे आमदार दिलीप लांडे यांच्या नेतृत्वाखाली साकीनाका सेंड ज्यूड स्कूल समोर काँग्रेस नेते माजी मंत्री सुनील केदार यांनी केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसंबंधीच्या वक्तव्य निषेदार्थ निर्दर्शने करत घोषणाबाजी करण्यात आली. चांदिवली मध्ये शिवसेना शिंदे गटाच्या शेकडो महिलांनी आमदार दिलीप लांडे यांच्या नेतृत्वात एकत्र येत सुनील केदार यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करीत मोर्चा काढला. आमचं सरकार आल्यानंतर आम्ही लाडकी बहीण योजना बंद करू असं म्हणणारे सुनील केदार यांच्या या वक्तव्याचा आमदार दिलीप लांडे यांनी चांगलाच समाचार घेतला. दरम्यान उपस्थित महिलांनी आक्रमक होत सुनील केंदार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत सुनील केदार यांच्या प्रतिमेला जोडे मारले. सावत्र भाऊ सुनील केदार याचा जाहीर निषेध अशा घोषणा देत परिसरात शिवसेनेची रॅली निघाली,यावेळी मोठ्या संख्येने स्थानिक महिला व शिवसैनिक उपस्थित होत्या.

*ह्युमॅनिटी ग्लोबल फाउंडेशन च्या वतीने बुधवार दिनांक 18 सप्टेंबर 2024 रोजी, गणपती विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी जुहू चौपाटी, मुंबई येथे समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ह्युमॅनिटी ग्लोबल फाउंडेशन चे सदस्य दीपक पवार, संतोष उनवणे, राजेंद्र पुजारी, उदय पुजारी, शिवाजी पिंपळे, जितेंद्र पवार, राकेश बामणे यांनी सहभाग घेतला.*



# राजापूर सहकारी बँक लि. चे मालाड सहकारी बँकेत विलीनीकरण

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील अडचणीत आलेल्या राजापूर सहकारी बँकेचे मालाड सहकारी बँकेत विलीनीकरण झाले आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मंगळवारी या विलीनीकरणाला मंजुरी दिली. हे विलीनीकरण 23 सप्टेंबर 2024 पासून लागू होणार आहे.

मुंबईच्या उपनगरातील मालाड सहकारी बँकेने रिझर्व्ह बँकेला राजापूर सहकारी बँकेच्या विलीनिकरणाचा प्रस्ताव पाठवला होता त्याला रिझर्व्ह बँकेने प्रतिसाद देवून मंजुरी दिली. मालाड सहकारी बँक उपनगरातील प्रगतिशील बँक असून बँकेच्या ५ शाखा आणि एक विस्तारित कक्ष आहे.

बँकेचे अध्यक्ष , माजी नगरसेवक विनोद मिश्रा यांनी या प्रसंगी आनंद व्यक्त करताना रिझर्व्ह बँकेच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. मालाड सहकारी बँक पुढच्या वर्षी आपला सुवर्ण महोत्सव साजरा करणार असल्याने या विलिनीकरणामुळे बँकेच्या शाखांमध्ये तीन शाखांची वाढ झाली आहे. मालाड सहकारी बँकेचा सुवर्ण महोत्सवी वर्षात आणखीन नवीन शाखा उघडण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी बँकेच्या प्रगती वर आनंद व्यक्त करत असताना बँकेचे सभासद, खातेदार आणि कर्मचारी या सर्वांना धन्यवाद दिले. मालाड बँक भविष्यात अशीच प्रगती करत राहील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

# नैसर्गिक आणि कृत्रिम विसर्जन स्थळांवर मिळून साडेपाचशे मेट्रिक टन निर्माल्य संकलन

## निर्माल्यापासून सेंद्रिय खत तयार करण्याची कार्यवाही सुरु

प्रतिनिधी
■ मुंबई

अनंत चतुर्दशी निमित्त मुंबईकर भाविकांनी लाडक्या बाप्पाला वाजतगाजत आणि भावपूर्ण निरोप दिला. श्री गणेश मूर्तींचे विसर्जन झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून विविध चौपाट्यांवर, समुद्र किनारी विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. त्याद्वारे ३६३ मेट्रिक टन घन कचरा संकलन करण्यात आले. चौपाट्यांवर दररोज सकाळी चालण्यासाठी (मॉर्निंग वॉक) नित्यनेमाने येणाऱ्या मुंबईकरांसाठी हा सर्व परिसर संपूर्ण स्वच्छ करून देण्यात आला.

यंदाच्या गणेशोत्सवात नैसर्गिक आणि कृत्रिम तलाव अशी सर्व मूर्ती विसर्जन स्थळे मिळून सुमारे ५५० मेट्रिक टन निर्माल्य संकलन करण्यात आले आहे. या निर्माल्यापासून सेंद्रिय खत तयार करण्याची कार्यवाही महानगरपालिकेने सुरू केली आहे.

मुंबई महानगरातील श्री गणेश मूर्ती विसर्जन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेकडून यंदाही विविध नागरी सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी पालिकेकडून विशेष तयारी करण्यात आली होती. सुमारे पंधरा हजार कर्मचारी तैनात होते. पर्यावरण पूरक श्री गणेशोत्सवाला चालना देण्यासाठी यंदा मूर्ती विसर्जनासाठी ६९ नैसर्गिक स्थळांसह एकूण २०४ कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली होती. निर्माल्य संकलनासाठी ५०० हून अधिक निर्माल्य कलश आणि ३५० निर्माल्य वाहक वाहने नेमलेली होती.

अनंत चतुर्दशी निमित्त मूर्ती विसर्जनानंतर स्वराज्य भूमी (गिरगाव), दादर, चिंबई, जुहू, वेसावे (वर्सोवा), मढ, गोराई समुद्र चौपाटी तसेच इतर सर्वत्र देखील विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. काल आणि परवा दिवसभर, संपूर्ण रात्रभर संपूर्ण दिवसभर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने अथक, अखंड कार्यरत राहून स्वच्छता मोहीम राबवली. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सुमारे सात हजार कामगार, कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या मदतीने केलेल्या स्वच्छतेतून एकूण ३६३ मेट्रिक टन घनकचरा संकलित करण्यात आला. स्वच्छतेविषयक ही कार्यवाही निरंतरपणे सुरू राहणार आहे. एवढेच नव्हे, तर संपूर्ण मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सवांचे परिसर, विसर्जन मिरवणुकांचे मार्ग इत्यादी ठिकाणी देखील स्वच्छतेची कार्यवाही अखंडपणे सुरू आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी काल विविध चौपाटींना भेट देत स्वच्छता विषयक कार्यवाहीची पाहणी केली.

साडेपाचशेमेट्रिकटननिर्माल्यसंकलन यंदा गणेशोत्सवात संकलित निर्माल्य पासून सेंद्रिय खत करण्याची कार्यवाही घनकचरा व्यवस्थापन खात्याद्वारे करण्यात येत आहे. यंदा गणेशोत्सवामध्ये सुमारे साडेपाचशे मेट्रिक टन निर्माल्य संकलन झाले आहे. महानगरपालिकेच्या २४ प्रशासकीय विभागांमध्ये असणाऱ्या विविध ३७ सेंद्रिय खत निर्मिती प्रकल्पांमध्ये हे निर्माल्य नेण्यात आले आहे.

## दिल्लीला मिळणार तिसऱ्या महिला मुख्यमंत्री, आतिशी आज घेणार शपथ

**नवी दिल्ली:** शनिवारी दिल्लीत मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होणार आहे. नामनिर्देशित मुख्यमंत्री अतिशी दुपारी साडेचार वाजता मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्यासोबत ५ मंत्रीही शपथ घेणार आहेत. आतिशी यांच्या मंत्रिमंडळात गोपाल राय, सौरभ भारद्वाज, कैलाश गेहलोत, इम्रान हुसेन आणि मुकेश अहलावत यांचा समावेश असेल. दिल्ली दारू घोटाळा प्रकरणात तुरुंगातून बाहेर आल्यानंतर अरविंद केजरीवाल यांनी १७ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर उद्या दिल्लीला तिसरी महिला मुख्यमंत्री मिळणार आहे.केजरीवाल यांनी राजीनाम्याची घोषणा केल्यानंतर विधिमंडळ पक्षाची बैठक झाली, ज्यामध्ये आतिशी यांच्या नावाला मंजुरी देण्यात आली. आतिशी या केजरीवाल सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री होत्या. आता शनिवारी आतिशी दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शपथविधीसाठी लेफ्टनंट गव्हर्नर कार्यालयात तयारी सुरू झाली आहे.



# हिझबुल्लाने इस्रायलवर 140 क्षेपणास्त्रे डागली

## इस्रायलचाही जोरदार प्रतिहल्ला; शेकडो नागरिक जखमी

वृत्तसंस्था
इस्रायल

हमास विरुद्ध इस्रायल असा वर्षभर संघर्ष उडाल्यानंतर आता इस्रायल विरुद्ध हिझबुल्ला अशा संघर्षाला तोंड फुटले आहे. मागच्या वर्षी ७ ऑक्टोबर रोजी हमासने इस्रायलवर अनपेक्षित हल्ला करून जवळपास १४०० नागरिकांची हत्या आणि शेकडो जणांचे अपहरण केले होते. या हल्ल्याला प्रत्युत्तर देताना इस्रायलने गाझापट्टीवर जोरदार हल्ले केले. वर्षभरापासून इस्रायल गाझा पट्टीवर हल्ले करत आहे. त्यादरम्यान आता लेबनानमधील हिझबुल्ला या संघटनेशीही इस्रायलचा संघर्ष सुरू झाला आहे. दोन दिवसांपूर्वी लेबनानमधील हिझबुल्लाच्या सदस्यांकडे असलेल्या पेजरचा स्फोट होऊन अडीच हजाराहून अधिक लोक जखमी झाले होते. तर अनेकजणांचा या हल्ल्यात मृत्यू झाला. त्यानंतर आता हिझबुल्लाने उत्तर इस्रायलवर १४० रॉकेट डागले आहेत.



इस्रायलचया लष्कराने सदर हल्ले झाल्याचे मान्य केले आहे. हिझबुल्लाने या हल्ल्याबाबत माहिती देताना सांगितले की, हवाई दलाचे तळ आणि इस्रायलच्या तोफखाना मुख्यालयाला या हल्ल्याद्वारे लक्ष्य करण्यात आले आहे.

दुसरीकडे इस्रायलच्यावतीने या हल्ल्याचे काही व्हिडीओ एक्सवर शेअर केले आहेत. तसेच हिझबुल्लाला या हल्ल्याची मोठी किंमत मोजावी लागणार असल्याचा इशाराही इस्रायलने दिला आहे. हिझबुल्ला गटाकडे ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी उत्तर इस्रायलवर हल्ला करण्याची प्रचंड लष्करी क्षमता आहे, तसेच तेल अवीवसारख्या मोठ्या लोकसंख्या असलेल्या शहरांसह ज्यू राज्याच्या इतर भागांवरदेखील हल्ला करण्याची क्षमता आहे. हिझबुल्लाने २००६ च्या इस्रायलबरोबरच्या युद्धात आपली लष्करी क्षमता दाखवली होती. हे युद्ध ३४ दिवस चालले. त्या दरम्यान १६५ इस्रायली ठार झाले (१२१ आयडीएफ सैनिक आणि ४४ नागरिक) आणि इस्रायलच्या अर्थव्यवस्थेचे आणि पर्यटन उद्योगाचे लक्षणीय नुकसान झाले. या युद्धात सर्वात मोठे नुकसान हिझबुल्ला आणि लेबनीजचे झाले. त्यांच्याकडील मृतांची संख्या किमान १,१०० होती. इस्रायल डिफेन्स फोर्सेस (आयडीएफ) या गटाला निष्प्रभ करण्यातही हिझबुल्ला अयशस्वी ठरले.

## चरबीयुक्त प्रसादावरुन वातावरण तापले

## 'सनातन धर्म रक्षण मंडळ' स्थापन करण्याची वेळ आलीय

### आंध्र प्रदेशच्या उपमुख्यमंत्र्यांची मागणी

वृत्तसंस्था
अमरावती

आंध्र प्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादाच्या लाडूंमध्ये जनावरांच्या चरबीचा वापर झाल्याचा गंभीर आरोप आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला. त्यांच्या या आरोपानंतर मोठी खळबळ उडाली. यावरून आता आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी सनातन धर्म संरक्षण मंडळ स्थापन करण्याचे आवाहन केल आहे.

"गेल्या सरकारच्या कार्यकाळात तिरुपती बालाजी प्रसादमध्ये प्राण्यांची चरबी (माशाचे तेल, डुकराचे मांस आणि गोमांस चरबी) मिसळल्याच्या निष्कर्षांमुळे आम्ही सर्वजण खूप व्यथित झालो आहोत. अनेक प्रश्नांची उत्तरे वायसीपी या तत्कालीन सरकारने स्थापन केलेल्या टीटीडी बोर्डाने द्यायला हवीत", असं पवन कल्याण म्हणाले. ते पुढे म्हणाले की आंध्र सरकार कठोर कारवाई करण्यास वचनबद्ध आहे.

संपूर्ण भारतातील मंदिरांशी संबंधित सर्व समस्यांवर लक्ष ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर 'सनातन धर्म संरक्षण मंडळ' स्थापन करण्याची वेळ आली आहे", असं पवन कल्याण म्हणाले. ते म्हणाले की धोरणकर्ते, धार्मिक प्रमुख, न्यायव्यवस्था, नागरिक आणि प्रसारमाध्यमे यांच्यात चर्चा होण्याची गरज आहे.

"माझा विश्वास आहे की, 'सनातन धर्माचा' कोणत्याही



स्वरूपात होणारा अपमान थांबवण्यासाठी आपण सर्वांनी त्वरित एकत्र आले पाहिजे", असंही ते म्हणाले.

तिरुपती मंदिरात भाविकांना प्रसाद म्हणून दिल्या जाणाऱ्या लाडूंमध्ये प्राण्यांची चरबी आणि फिश ऑईलचे अंश आढळून आल्याचे सिद्ध झाले असल्याची माहिती लॅबच्या तपासणी रिपोर्टमधून समोर आली आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी मागील वायएसआर काँग्रेस सरकारवर तिरुपती मंदिरातील प्रसादाच्या लाडूंमध्ये प्राण्यांची चरबी वापरल्याचा आरोप केला होता. आता तेलुगु देसम पक्षाने यासंदर्भातील प्रयोगशाळेचा एक रिपोर्ट समोर आणला आहे. या रिपोर्टमधून धक्कादायक माहिती समोर आली आहे. प्रयोगशाळेच्या रिपोर्टमध्ये असं उघड झालं आहे की, तिरुपती मंदिरात लाडू बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तुपाच्या नमुन्यांमध्ये प्राण्यांची चरबी, फिश ऑइल आणि बीफ टॅलोचा समावेश होता. या प्रयोगशाळेचा रिपोर्ट सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. तसेच यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. तसेच हा रिपोर्ट भारतीय जतना पक्षाचे नेते विनोद तावडे यांनी देखील एक्सवर शेअर केला आहे.

पान १ वरुन

### काँग्रेसला गणपती पुजेची अडचण

काँग्रेसचे नेते देशाबाहेर जातात आणि राष्ट्रविरोधी वक्तव्यं करतात, असं म्हणत मोदी यांनी राहुल गांधी यांचा समाचार घेतला. काँग्रेसच्या राजकारणाबद्दल बोलताना मोदी म्हणाले "आज काँग्रेस मध्ये देशभक्ती नावाला सुद्धा शिल्लक राहीलेली नाही. हा तो पक्ष नव्हेच, ज्या सोबत महात्मा गांधी एके काळी जोडले गेले होते. आजच्या काँग्रेस मध्ये केवळ द्वेष भरला आहे. परदेशात जाऊन देश तोडण्याची भाषा करणं, भारतीय संस्कृतीचा आणि श्रद्धेचा वारंवार अपमान करणे ही त्यांची ओळख बनली आहे." तुष्टीकरण करण्यासाठी काँग्रेस कुठल्याही थराला जाऊ शकते. कर्नाटक मध्ये, गणपती बाप्पाला सुद्धा तुरुंगात डांबण्यात आले आहे. ज्या मुर्तीची लोक पुजा करतात, तिला चक्क पोलीस व्हॅन मध्ये टाकण्यात आले. तेलंगणा मध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफीचं केवळ आश्वासन देण्यात आले. खोटं बोलणं हा काँग्रेसाचा गुणधर्म झाला आहे. असं सुद्धा मोदी म्हणाले.

### कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्वकर्मा योजना महत्वाची- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

देशातील गरीब, वंचित तसेच परंपरागत व्यवसाय करणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्वकर्मा ही योजना अत्यंत महत्वाची आहे. या योजनेच्या माध्यमातून कारागिरांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याला प्राधान्य राहणार असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, अमरावती येथे पीएम मित्रा पार्क हा देशातील वस्त्रोद्योगाच्या विकासाला चालना देणारा ठरणार आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापसावर प्रक्रिया करून कापड निर्यातीला चालना मिळणार आहे. या पार्कमध्ये 10 हजार कोटीची गुंतवणूक होणार असून सुमारे 1 लाखापेक्षा जास्त रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनांमुळे राज्यातील महिला व इतर घटकांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला पोषक ठरणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. केंद्रीय लघु, सुक्ष्म व मध्यम उद्योग मंत्री जीतनराम मांझी यावेळी म्हणाले की, पीएम विश्वकर्मा ही योजना पारंपरिक कारागीर व शिल्पकारांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडविणारी आहे. त्यांना उच्च गुणवत्ता व प्रशिक्षण देऊन त्यांनी उत्पादित केलेला माल जागतिक बाजारपेठेत पाठवण्यास प्राधान्य दिले आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्रात 1 लाख 46 हजार कारागिरांची नोंदणी झाली आहे. कारागिरांना अत्याधुनिक साधनांसाठी 5 टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येत असून त्यांच्या उत्पादीत वस्तुंना मोठी बाजारपेठ निर्माण करण्यात आली आहे. भारतातील कारागिरांनी तयार केलेल्या विविध वस्तुंच्या उत्पादनांचे प्रदर्शन वर्धा येथे आयोजित करण्यात आले असून या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामिण कारागिरांना प्रोत्साहन मिळणार असल्याचे मांझी यांनी यावेळी सांगितले.

# बीएसएफची मिजोरममध्ये मोठी कारवाई; भारत-बांगलादेश सीमेवर 40 कोटींचे ड्रग्ज जप्त

वृत्तसंस्था
आयझोल

मिझोराममधील भारत-बांगलादेश सीमेवर सीमा सुरक्षा दलाने सुमारे 40 कोटी रुपये किमतीच्या 'याबा' नावाच्या अमली पदार्थाच्या चार लाख गोळ्या जप्त केल्या आहेत. अधिकाऱ्यांनी शुक्रवारी ही माहिती दिली. सीमा सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांनी गुरुवारी राज्य सरकारच्या विशेष अँटी नार्कोटिक्स पोलिसांसोबत संयुक्त कारवाई केली आणि राष्ट्रीय महामार्ग 6 वर आयझोल जिल्ह्यातील सेलिंग शहरात एक ट्रक अडवला.

ट्रक चालकाच्या केबिनच्या छतावरून चार लाख मेथॅम्फेटामाइन



गोळ्या (याबा) असलेली एकूण 40 पाकिटे जप्त करण्यात आली. आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत 40 कोटी रुपये आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, या वर्षी आतापर्यंत या सीमावर्ती भागात 6,29,880 हून अधिक याबा गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. मिझोराममध्येच 5.2 कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले असून याप्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली आहे.

मिझोराम पोलिसांनी सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) जवानांसह सैतुअल जिल्ह्यात दोन ऑपरेशनमध्ये 5.26 कोटी रुपयांच्या हेरॉइन आणि मेथॅम्फेटामाइन गोळ्या जप्त केल्या आहेत. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने शुक्रवारी ही माहिती दिली. पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, एक ऑपरेशन आयझोलमध्ये तर दुसरे ऑपरेशन गुरुवारी सेलिंगमध्ये करण्यात आले. पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) लालबियाकाथांग खियानगेट यांनी सांगितले की, प्रतिबंधित वस्तू बाळगल्याप्रकरणी दोन मणिपुरी आणि एक त्रिपुरा रहिवासी यांना अटक करण्यात आली आहे.

ते म्हणाले की, कारवाईदरम्यान गुरुवारी आयझोलमधील बावनकन येथे बोलेरो वाहन थांबविण्यात आले. वाहनाची झडती घेतली असता 11.34 लाख रुपये किमतीचे 378 ग्रॅम हेरॉईन जप्त करण्यात आले. जप्तीप्रकरणी मणिपूरच्या चुराचंदपूर शहरातून दोघांना अटक करण्यात आली आहे. दुसऱ्या कारवाईत, सैतुअल जिल्ह्यातील सेलिंग गावाच्या हद्दीत एक ट्रक थांबवण्यात आला आणि 5.1 कोटी रुपये किमतीचे 39.6 किलो मेथॅम्फेटामाइन जप्त करण्यात आले. आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### हायकोर्टाने सुधारित आयटी नियम ठरवले घटनाबाह्य

पान १ वरुन

दुरुस्ती आणून नवे नियम अंतर्भूत केले होते. 'सुधारित नियमांप्रमाणे सरकारविरोधातील संबंधित कोणताही ऑनलाईन मजकूर हा खोटा किंवा चुकीचा किंवा दिशाभूल करणारा आहे का, हे तपासण्यासाठी सत्यशोधक कक्ष निर्माण करण्याची तरतूद केली आहे. त्या कक्षाने विशिष्ट मजकूर हटवण्यास किंवा त्यात दुरुस्ती करण्यास सांगितले, तर सोशल मीडिया चालवणाऱ्या कंपन्यांना तसे करावे लागणार आहे. तसे न केल्यास आयटी कायद्याच्या कलम ७९ अन्वये असलेल्या संरक्षणापासून त्यांना मुकावे लागणार आहे. म्हणजेच सरकारची मनमानी चालणार आहे.

या नियमांच्या आधारे सरकारविरोधात काहीही म्हटले तर ते खरे की खोटे, बरोबर की चूक हे सरकार स्वत:च ठरवणार आहे. म्हणजे केंद्र सरकार स्वत:च एकप्रकारे न्यायाधीशाच्या व खटला चालवणाऱ्याच्याही भूमिकेत राहणार आहे. अशा वादांबाबत सुनावणी किंवा अपीलची तरतूदही सरकारने नियमांत केलेली नाही. म्हणजे या नियमांत नैसर्गिक न्यायतत्त्वालाही तिलांजली देण्यात आली आहे. सुधारीत नियम हे नागरिकांच्या भाषा व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहेत', असे निदर्शनास आणत स्टँडअप हास्यकलाकार कुणाल कामरा यांनी याचिका केली होती.

## युक्रेनला शस्त्रे पाठवण्याचा अहवाल चुकीचा

### भारताचे स्पष्टीकरण

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

भारतातून युक्रेनला दारूगोळा पाठवण्यासंबंधी रॉयटर्सच्या अहवालावर भारत सरकारने तीव्र आक्षेप व्यक्त केला आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने याला चुकीचे म्हटले आहे.

गुरुवारी या अहवालावरील प्रश्नांना उत्तर देताना परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, 'आम्ही रॉयटर्सचा अहवाल पाहिला आहे. हे काल्पनिक आणि दिशाभूल करणारे आहे. त्यात नियमांचे उल्लंघन होत असल्याचे म्हटले आहे, तर तसे काहीही नाही.

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटले आहे की, भारत लष्करी वस्तूंच्या निर्यातीबाबत आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करतो आणि या बाबतीत भारताचा ट्रॅक रेकॉर्ड निर्दोष आहे. युक्रेन रशियाविरुद्ध भारतीय दारूगोळा वापरत आहे यापूर्वी रॉयटर्सच्या एका अहवालात दावा केला होता की युक्रेन रशियाविरुद्धच्या युद्धात भारतीय दारूगोळा वापरत आहे. भारताने ही शस्त्रे युरोपीय देशांना विकली होती, पण आता युक्रेन त्यांचा वापर करत असल्याचे सांगण्यात आले.

# आर्मी ऑफिसरला पोलिस ठाण्यात मारहाण

## पत्नीचा लैंगिक छळ

वृत्तसंस्था
भुवनेश्वर

ओडिशातील भुवनेश्वरमधील भरतपूर पोलिस ठाण्यात लष्कराच्या अधिकाऱ्यावर हल्ला आणि होणाऱ्या पत्नीचा लैंगिक छळ झाल्याची घटना समोर आली आहे. पीडित तरुणी लष्कराच्या अधिकाऱ्यासोबत पोलिस स्टेशनमध्ये रोड रेजची तक्रार देण्यासाठी गेली होती.

मात्र, पोलिस ठाण्यातील पोलिसांनी त्यांच्याशी आधी गैरवर्तन केले. त्यानंतर लष्कराच्या अधिकाऱ्याला लॉकअपमध्ये बंद करण्यात आले. पीडितेने विरोध केला असता तिला मारहाण करण्यात आली आणि तिचे हातपाय बांधले गेले.

पीडितेच्या म्हणण्यानुसार, एका पुरुष अधिकाऱ्याने तिचे अंतर्वस्त्र काढले. त्यानंतर छातीवर लाथ मारली. तेवढ्यात प्रभारी निरीक्षक आले. त्यांनी पीडितेची पॅन्ट खाली खेचली. त्यानंतर प्रायव्हेट पार्ट दाखवून अश्लील बोलले.

ही घटना 15 सप्टेंबरची आहे. पोलिसांनी पीडितेला गैरवर्तनाच्या आरोपाखाली अटक केली होती. 19 सप्टेंबर रोजी उच्च न्यायालयातून जामीन मिळाल्यानंतर त्यांनी हा खुलासा केला. ओडिशा पोलिसांनी प्रभारी निरीक्षकासह पाच पोलिसांना निलंबित केले आहे.

पीडित महिला रेस्टॉरंट बंद करून आर्मी ऑफिसरसोबत घरी परतत होती पीडितेने सांगितले की, रविवारी रात्री 1 वाजण्याच्या सुमारास ती आपले रेस्टॉरंट बंद करून एका आर्मी ऑफिसरसोबत घरी परतत होती. वाटेत काही तरुणांनी त्यांचा मार्ग अडवण्याचा प्रयत्न करून त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. पोलिसांकडे



तक्रार करण्यासाठी आणि मदत मागण्यासाठी त्यांनी भरतपूर पोलिस ठाणे गाठले.त्यांनी तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता सिव्हिल ड्रेसमध्ये उपस्थित असलेल्या महिला पोलिसाने त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. काही वेळाने आणखी काही पोलिस गस्तीवर असलेल्या वाहनातून पोलिस ठाण्यात पोहोचले.

## वलसाड रेल्वे स्थानकावर तरुणाने मारली रुळावर उडी, जागीच मृत्यू

वलसाड

गुजरातमधील वलसाड रेल्वे स्थानकावर बुधवारी संध्याकाळी एका तरुणाने रेल्वेखाली येऊन आत्महत्या केली. आत्महत्येची संपूर्ण घटना रेल्वे फलाटावर लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून त्याचे फुटेज आज समोर आले आहे. सीसीटीव्हीमध्ये हा तरुण फलाटावर ट्रेन येण्याची वाट पाहत असल्याचे दिसत आहे. ट्रेन जवळ येताच तो वेगाने धावत रुळावर उडी मारतो. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे हा तरुण प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर बराच वेळ चालत असल्याची माहिती रेल्वे पोलिसांनी दिली. दरम्यान, संपर्क क्रांती एक्स्प्रेसची सायंकाळी 7.43 वाजता येण्याची वेळ होती. ट्रेन जवळ येताच तरुणाने रुळावर उडी मारली. आत्महत्येचे हे भीषण दृश्य पाहून फलाटावर बसलेले लोक हादरले. भरधाव वेगात आलेल्या रेल्वेखाली चिरडल्याने तरुणाचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वलसाड जीआरपीचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि तरुणाच्या मृतदेहाचा प्राथमिक तपास केला. मात्र कोणतेही ओळखपत्र मिळाले नाही. रेल्वे पोलिसांनी घटनेची नोंद करून मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवला आहे.

## अमेरिकी महिलेचा निर्वासित तिबेटी खासदारांवर हल्ला

### मॅक्लोडगंजमध्ये गाडी थांबवून धमकी, महिला ताब्यात

वृत्तसंस्था
धर्मशाळा

गुरुवारी अमेरिकन वंशाच्या तिबेटी परदेशी महिलेने निर्वासित तिबेटी खासदाराची कार थांबवली आणि हिमाचल प्रदेशातील धर्मशाला येथील मॅक्लॉडगंज येथील केंद्रीय तिबेट प्रशासनाच्या मुख्य कार्यालयाबाहेर हल्ला केला. हल्ल्यापूर्वी गुप्तचर माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी आधीच हजर होते. त्यामुळे निर्वासित तिबेटी खासदारावर विदेशी महिलेचा हल्ला फसला. त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या महिलेला पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे.

तिबेटींचे सर्वोच्च आध्यात्मिक नेते दलाई लामा यांच्या हत्येबाबत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर दुर्भावनापूर्ण टिप्पण्या केल्याच्या एका दिवसानंतर निर्वासित तिबेटी खासदारांवर हल्ला झाला. हल्ला करणाऱ्या विदेशी महिलेला ताब्यात घेऊन तपास सुरू आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, हल्ला करणारी महिला तिबेटी वंशाची अमेरिकन नागरिक आहे. महिलेचा पासपोर्ट आणि व्हिसा तपासला जात आहे. ही महिला मॅक्लॉडगंजमध्ये कधी आणि कोणत्या उद्देशाने पोहोचली याचा पोलीस शोध घेत आहेत.

कांगडा एसपी शालिनी अग्निहोत्री यांनी सांगितले की, महिलेच्या हल्ल्यामागील हेतू शोधला जात आहे. त्या म्हणाल्या, गुप्तचर माहितीच्या आधारे पोलीस आधीच सतर्क होते. त्यामुळे हल्ला हाणून पाडण्यात आला. हल्ला करणारी महिला अमेरिकन नागरिक आहे. तिची चौकशी सुरू आहे. आजकाल मॅक्लॉडगंजमध्ये निर्वासित 17व्या तिबेटी संसदेचे 8वे सर्वसाधारण अधिवेशन सुरू आहे.

# देशाचा मान्सून ट्रॅकर :यूपीतील 450 गावे पाण्याखाली

## बंगालमध्ये पुरामुळे 3 जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

यूपीमध्ये सततच्या पावसामुळे 21 जिल्ह्यांतील 450 हून अधिक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. गंगा, यमुना, घाघरा, शारदा, सरयू नद्यांना उधाण आले आहे. कानपूरमध्ये 2000 घरे पुरात बुडाली आहेत. अनेक घरांची पडझड झाली. 10 हजार लोकांची सुटका करण्यात आली आहे.

दुसरीकडे पाटण्यात गंगेच्या पाण्याची पातळी सातत्याने वाढत आहे. वैशालीमध्येही गंगा ओव्हरफ्लो झाल्यामुळे राघोपूर डायरा येथील रस्त्यांवर पुराचे पाणी आहे. हिमाचल प्रदेशातील पावसामुळे NH-5 (भारत-तिबेट) सह 37 रस्ते बंद करण्यात आले आहेत.





पश्चिम बंगालमध्येही अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामध्ये ३ जणांचा मृत्यू झाला आहे. 2.5 लाख लोक बाधित झाले आहेत. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी म्हणाल्या- हे केंद्राचे षडयंत्र आहे. हा पूर केंद्र सरकारच्या निष्काळजीपणाचा परिणाम आहे.

हे पाणी बंगालचे नाही, तर झारखंडचे आहे. झारखंडची सीमा ३ दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. दामोदर खोरे महामंडळाच्या धरणातून हे पाणी सोडण्यात आले आहे. DVC चे नियंत्रण केंद्राच्या हातात आहे.

बिहारच्या कैमूरमध्ये पूर, यूपीशी संपर्क तुटला बिहारच्या कैमूरमध्ये कर्मनासा नदीला उधाण आले आहे. त्यामुळे कैमूरला उत्तर प्रदेशशी जोडणारा रस्ता जलमय झाला आहे. कैमूरचा उत्तर प्रदेशशी संपर्क तुटला आहे. छपरा येथील NH-19 वरही पुराचे पाणी वाहत आहे. सुपौलमधील पुलाचा मार्ग कोसी नदीत वाहून गेला, त्यामुळे सुपौलचा दरभंगा-मधुबनी गावांचा संपर्क तुटला.

दिल्लीतील तापमान 21.1 अंशांवर घसरले, सप्टेंबरमधील 14 वर्षांतील सर्वात कमी तापमान . दिल्ली-एनसीआरमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे गुरुवारी किमान तापमान २१.१ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. गेल्या 14 वर्षांतील सप्टेंबरमध्ये नोंदवलेले हे सर्वात कमी तापमान असल्याचे हवामान खात्याच्या आकडेवारीनुसार 13 सप्टेंबर रोजी नोंदवलेला 21.4 अंश सेल्सिअसचा विक्रम गुरुवारी किमान तापमानाने मोडला.

## कर्नाटक हायकोर्ट जजचे वादग्रस्त वक्तव्य

### पश्चिम बंगळुरुमधील मुस्लिमबहुल भाग पाकिस्तानच

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

शुक्रवारी झालेल्या सुनावणीदरम्यान कर्नाटक उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी दिलेल्या दोन वादग्रस्त विधानांवर सर्वोच्च न्यायालयाने कारवाई केली आहे. CJI DY चंद्रचूड यांनी कर्नाटक उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रार जनरल यांना न्यायमूर्ती वेदव्यासचार श्रीशानंद यांच्या टिप्पण्यांवर 2 आठवड्यांच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

CJI यांनी याप्रकरणी ॲटर्नी जनरल (AG) आर. वेंकटरामानी आणि सॉलिसिटर



जनरल (SG) तुषार मेहता यांचीही मदत मागितली आहे. न्यायालयाने असेही म्हटले की ते काही मूलभूत मार्गदर्शक तत्त्वे जारी करू शकतात.

येथे, व्हिडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर, कर्नाटक उच्च न्यायालयाने कार्यवाहीच्या लाइव्ह स्ट्रिमिंगच्या गैरवापराविरूद्ध इशारा दिला आहे. डिस्क्लेमरमध्ये असे म्हटले आहे की कोणीही कारवाईची रेकॉर्डिंग करणार नाही.

न्यायमूर्ती श्रीशानंद यांचे दोन व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. एका व्हिडिओमध्ये ते पश्चिम बंगळुरूमधील एका मुस्लिमबहुल भागाला पाकिस्तान म्हणताना दिसत होते. तर दुसऱ्या व्हिडिओमध्ये ते एका महिला वकिलाला फटकारताना दिसत आहेत. न्यायमूर्ती श्रीशानंद यांनी महिला वकिलाला सांगितले की, मला विरोधी पक्षाची बरीच माहिती आहे. कदाचित पुढच्या वेळी तिच्या अंडरगारमेंटचा रंगही सांगतील.

